दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक २४५ । गुरुवार १८ जून २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




'सहजयोग'

भाग ८६

### कुंडलिनी व शास्त्र...

आपण म्हणजे अगदीच विपरीत लोक झालेलो आहोत. म्हणजे किती कमालीची गोष्ट आहे कि फक्त हिंदू शास्त्रांमध्ये कुंडलिनीबद्दल इतकं सुंदर वर्णन ह्याच्यातल्या दृष्ट्यांनी दिलेलं आहे. म्हणजे हिंदू शास्त्र म्हणण्यापेक्षा, भारतीयातल्या लोकांना त्याचं जेवढं ज्ञान झालेलं आहे ते कुणालाही सबंध पृथ्वी लोकांत नाही झालं. आणि इतकं सांगोपांग आणि व्यवस्थित त्याचं सगळं काही त्यांनी वर्णन केल्यावर, आणि त्याचा जर शोधच जर हिंदुस्थानात लागला आहे तर त्याबद्दल तुम्हाला माहिती हवे. आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? मी आपल्याला सांगितलं आहे कि आपल्यामध्ये चैतन्य भरलेलं आहे. ते कुंडलिनीच्या द्वारे ते आपल्यामध्ये असतं. स ह ज म्हणजे स्वताःबरोबर असलेले जन्मतः. हि तुमची आई जी तुम्हाला जन्म देणार आहे ती तुमच्यातच देणार आहे. आपल्याला तिची माहिती नसते पण तिला आपली माहिती असते. तिची वाट बघत ती बसलेली असते कि अशी कोणी शुध्द इच्छा जर केली तर माझ्या मुलाला काही त्रास झाला नाही पाहिजे. तिचं सगळं समजणारी, तिच्या त्या मुलाच्या आतला सगळा भार कसा अगदी जपून सांभाळून त्या कुंडलिनीला वर उठवेल अशी ती कुंडलिनीसारखी तुमची आई वाट पाहते. हे मला माहित होतं. पण तिला वरती आणायला एकच प्रश्न होता कि मधे एक पोकळी आहे त्याच्यामध्ये काय करायचं? त्या पोकळीला आल्याबरोबर ती कुंडलिनी मागे येते. कुंडलिनी कधीही दुसऱ्या कोणत्याही मार्गांनी कधीही उठणार नाही. इडा आणि पिंगलाने कुंडलिनी उठत नाही.

१६ सप्टेंबर १९७३, पुणे

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### २३ जून 'एकल महिला दिवस'

मुंबई : संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेला २३ जून हा 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि ग्रामपंचायतींमध्ये 'एकल महिला दिवस' म्हणून साजरा करण्यात यावा, यावेळी गावातील किंवा शहरातील सर्व एकल महिलांना सन्मानाने या कार्यक्रमाला निमंत्रित करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. एकल महिलांच्या सन्मानासाठी ग्रामपंचायतींमध्ये ठराव करण्यात यावा असेही त्या म्हणाल्या. राज्य शासनामार्फत एकल महिला धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून या पार्श्वभूमीवर एकल महिलांच्या समस्या, अपेक्षा आणि त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यात 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' ही सन्मानजनक संज्ञा वापरण्यात यावी; तसेच, गाव अथवा शहरामध्ये एकल महिलांना रूढी-परंपरांच्या आधारावर अपमानास्पद वागणूक दिली जाणार नाही.

# सहा खासदार 'ऑपरेशन टायगर'चे शिकार

## स्वतंत्र गट स्थापना : लोकसभा अध्यक्षांना पत्र

### भाजपावर षडयंत्राचे आरोप, रोहित पवारांचा 'ऑपरेशन बाजार' टोला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा भूकंपाचा प्रत्यय आला. गेल्या काही दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या ऑपरेशन टायगरची चर्चा प्रत्यक्षात आली. एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे सहा खासदार फोडण्यात यश मिळवले. या सहा खासदारांना घेऊन एकनाथ शिंदे हे बुधवारी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांच्या दिल्लीतील कार्यालयात गेले होते.**

ठाकरे गटाच्या ६ बंडखोर खासदारांनी आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र लोकसभा अध्यक्षांना देत शिंदे गटाला पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट केले. यानंतर लोकसभा अध्यक्षांनी सहा बंडखोर खासदारांच्या या स्वतंत्र गटाला मंजुरी दिली. पक्षांतरबंदी कायद्यानुसार लागणारे दोन तृतीयांश खासदार फुटल्यामुळे या गटातील खासदारांवर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही. त्यामुळे आता सहा खासदारांचा हा गट लवकरच शिवसेनेत विलीन होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

या घडामोडीनंतर ठाकरे गटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पक्षाने तत्काळ सर्व खासदारांना व्हिप जारी केला आहे. दरम्यान, ठाकरे गटाने फुटीचे वृत्त फेटाळून लावत ही केवळ अफवा असल्याचा दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी मोठा राजकीय दावा करत ऑपरेशन टायगरमुळे एकनाथ शिंदे यांची ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे म्हटले आहे. भविष्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राष्ट्रीय राजकारणात गेल्यास एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संजय राऊत यांनी केलेल्या १५ कोटी रुपयांच्या ऑफरच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे सांगत त्यांनी उलट भविष्यात राऊतही शिंदे गटात येतील, असा टोला लगावला.

दुसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संपूर्ण प्रकरणाशी भाजपाचा कोणताही संबंध नसल्याचा दावा केला आहे. ठाकरे गटातील खासदार आणि आमदार पक्ष का सोडत आहेत, याचे आत्मपरीक्षण उद्धव ठाकरे यांनी करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. कोणी कुठे जाते हा त्यांचा अंतर्गत विषय असून भाजपाला विनाकारण बदनाम केले जात आहे, असे बावनकुळे म्हणाले.

मात्र, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी याउलट गंभीर आरोप करत 'ऑपरेशन टायगर' हे भाजपाने आखलेले राजकीय षडयंत्र असल्याचा दावा केला. ठाकरे गटातील एका खासदाराला मंत्रीपदासह १०० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मतदारांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारे भूमिका बदलणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. एकनाथ शिंदे यांचा केवळ वापर केला जात आहे, अशी टीका दमानिया यांनी केली.या संपूर्ण घडामोडींवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी अत्यंत आक्रमक प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी या प्रकरणाला 'ऑपरेशन टायगर' नव्हे तर 'ऑपरेशन बाजार' असे संबोधत लोकशाही आणि संविधान धोक्यात असल्याचा आरोप केला. एकेका (पान ४ वर)

#### दोन खासदार परतीच्या मार्गावर...

**ज्या सहा खासदारांनी बंडखोरी केली, त्यातील दोन खासदार परत येण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार धाराशीवचे खासदार ओम राजे निंबाळकर आणि इशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील हे ठाकरे यांच्या बैठकीला हजर राहू शकतात. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते या दोन्ही खासदारांच्या संपर्कात आहेत. सोबतच या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना द्यावयाच्या पत्रावर सही केलेली नाही.**

#### फुटीच्या चर्चेतील खासदार



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ओमराजे निंबाळकर | भाऊसाहेब वाकचौरे | नागेश आष्टीकर | संजय देशमुख | संजय दिना पाटील | संजय जाधव |
| धाराशिव | शिर्डी | हिंगोली | वाशिम | ईशान्य मुंबई | परभणी |

#### आज ठाकरे गटाची महत्त्वाची बैठक

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संसदीय मंडळाची बैठक आज गुरुवारी आयोजित करण्यात आली आहे. सर्व खासदारांना व्हिप जारी केला असून कोणते खासदार उपस्थित राहतात याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या बैठकीनंतर ठाकरे गटाची अधिकृत भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता आहे.**


## प्रेमाचा शेवट चितेवर !

# अल्पवयीन मुलीचा खून करुन मृतदेह जंगलात जाळला

### प्रियकरासह आई-वडिलांवर खुनाचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** इन्स्टाग्रामवर जुळलेली ओळख, त्यातून फुललेले प्रेम, कुटुंबीयांचा विरोध, चारित्र्याचा संशय आणि अखेर एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा निर्घृण अंत... श्रीगोंदा तालुक्यात उघडकीस आलेल्या या थरारक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. प्रेमसंबंधात असलेल्या अल्पवयीन मुलीची हत्या करून तिचा मृतदेह जंगलात नेऊन पेट्रोल टाकून जाळल्याचा आरोप प्रियकर आणि त्याच्या आई-वडिलांवर करण्यात आला असून, या प्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी खून, पुरावा नष्ट करणे, पॉक्सो आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले



असून इतर आरोपीना ताब्यात घेण्याचे काम सुरु आहे. पोलिसांकडे दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, श्रीगोंदा शहरातील एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलीची सुमारे वर्षभरापूर्वी इन्स्टाग्रामच्या माध्यमातून शुभम सुखदेव ओव्हाळ याच्याशी ओळख झाली होती. कालांतराने दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. अल्पवयीन मुलगी ही अनुसूचित जाती समाजातील असल्याने या संबंधाला शुभमच्या कुटुंबीयांचा विरोध होता, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून दोघेही श्रीगोंदा शहरातील (पान ४ वर)

# एनडीए दोन तृतीयांश बहुमताच्या उंबरठ्यावर?

### महिला आरक्षण व मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांवर पुन्हा चर्चा होण्याची शक्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला २० जुलैपासून प्रारंभ होत असल्याने राष्ट्रीय राजकारणातील घडामोडींना वेग आला आहे. विविध विरोधी पक्षांतील कथित फूट, बदलती आघाडीची समीकरणे आणि काही पक्षांची स्वतंत्र भूमिका यामुळे लोकसभेतील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) संख्याबळ वाढत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यामुळे महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयके पुन्हा एकदा संसदेत मांडली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एप्रिल महिन्यात झालेल्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेसंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. त्या वेळी विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली होती. घटनादुरुस्तीसाठी आवश्यक असलेले दोन तृतीयांश बहुमत सरकारला मिळाले नव्हते. त्यामुळे विधेयक फेटाळले गेले होते.

मात्र त्यानंतरच्या दोन महिन्यांत विरोधी पक्षांमधील राजकीय हालचालींमुळे सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि तृणमूल काँग्रेसमधील काही खासदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याने लोकसभेतील समीकरणांमध्ये बदल झाल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर आगामी अधिवेशनात केंद्र सरकार पुन्हा एकदा महत्त्वाच्या घटनादुरुस्ती विधेयकांवर भर देण्याची शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, दक्षिण भारतातील राजकीय घडामोडींवरही भाजप आणि एनडीएची बारकाईने नजर असल्याचे मानले जाते. विशेषतः तमिळनाडूमधील बदलत्या राजकीय समीकरणांचा लोकसभेतील संख्याबळावर परिणाम होऊ शकतो, (पान ४ वर)

#### दोन तृतीयांश बहुमताचे गणित





- लोकसभेची एकूण सदस्यसंख्या ५४०
- दोन तृतीयांश बहुमतासाठी आवश्यक पाठिंबा ३६०
- एप्रिलमधील मतदानात विधेयकाच्या बाजूने मते २९८
- आवश्यक मतांपेक्षा कमी ५४
- सध्याच्या चर्चेतील एनडीएचे संभाव्य संख्याबळ ३२४
- दोन तृतीयांश बहुमतासाठी अजून आवश्यक ३६
- द्रमुकचे २२ खासदार साथ दिल्यास संभाव्य आकडा ३४६
- त्यानंतरही आवश्यक संख्या १४
- मतदानावेळी अनुपस्थित किंवा तटस्थ खासदारांची भूमिका निर्णायक

**विशेष: घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केवळ संख्याबळ नव्हे, तर मतदानावेळी उपस्थित सदस्यांची संख्या आणि विरोधकांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची ठरणार आहे.**

# होर्मुझ खुली होणार, नाकेबंदी हटणार...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदीचा करार झाला असून, येत्या शुक्रवारी करारावर स्वाक्षरी होणार आहे. उभय देशातील करारात नमूद मुद्यांची माहिती आता समोर आली आहे. 'ब्लूमबर्ग'ने करारातील १४ मुद्द्यांची माहिती प्रसिद्ध केली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी वाहतुकीसाठी पुन्हा खुली करणे आणि इराणला मर्यादित आर्थिक मदत देणे यासह इराण अण्वस्त्र विकसित



करणार नाही, या मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे.

करारानुसार, इराण आणि अमेरिका, मित्रराष्ट्रांसह सर्व हल्ले आणि हिंसक कारवाई तातडीने आणि कायमचे थांबवण्यास सहमत झाले आहेत. दोन्ही देश एकमेकांच्या (पान ४ वर)

# फिल्मी स्टाईल फसवणूक; बनावट बँक शिक्क्याने सव्वा चार लाखांचा अपहार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दिल्ली गेट परिसरातील एका मोबाईल दुकानात काम करणाऱ्या सेल्स प्रमोटरने बँकेचा बनावट शिक्का तयार करून सुमारे सव्वा चार लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी दुकान मालकांनी तोफखाना पोलीस ठाणे तसेच पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली गेट येथील एस. एस. मोबाईल या दुकानात सेल्स प्रमोटर म्हणून कार्यरत असलेला मिलिंद मोरे (उर्फ अंकित मोरे) याच्याकडे कंपनीकडे जमा करण्यासाठी वेळोवेळी रोख रक्कम देण्यात येत होती. मोरे याने प्रत्येक वेळी संबंधित रक्कम बँकेत जमा केल्याचे सांगत बँकेच्या शिक्क्यासह जमा पावत्या दुकान मालकांना दिल्या होत्या.

मात्र कंपनीकडून खात्याची पडताळणी करण्यात आल्यानंतर संबंधित रक्कम खात्यात जमा झालेली नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर बँकेत चौकशी केली असता मोरे याने वापरलेला शिक्का बनावट असल्याचे उघड झाले. तसेच प्रत्यक्षात कोणतीही रक्कम बँकेत जमा करण्यात आलेली नव्हती.

दुकानमालक प्रमोद गुंडू यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने वेगवेगळ्या दिवशी घेतलेल्या रकमेचा एकूण आकडा ४ लाख १७ हजार १०० रुपये इतका आहे. विश्वास संपादन करून त्याने ही रक्कम स्वतःकडेच ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, मिलिंद मोरे हा १ मार्चपासून सुट्टीवर असल्याचे सांगत होता. (पान ४ वर)

# डोक्यावर घेणारेच वाकचौरेंना डोक्यावर आपटणार!

## शिवसैनिक आक्रमक : खा. वाकचौरे यांच्या घराजवळ बंदोबस्त वाढला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** शिर्डीचे ठाकरे गटाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आज, बुधवारी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून शिंदे गटात प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी शहरातील निष्ठावान शिवसैनिकांमध्ये त्याचे तिव्र पडसाद उमटले. वाकचौरे यांचा निषेध करीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान वाकचौरे यांच्या शिर्डीतील घराजवळ पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

वाकचौरे यांनी शिर्डीत येऊन





दाखवावे, त्यांना शिवसेना 'स्टाईल'ने उत्तर देवू, वाकचौरे यांना डोक्यावर घेणारा शिवसैनिक त्यांना डोक्यावर आपटल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देत ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन कोते, उपजिल्हाप्रमुख नानाभाऊ बावके, तालुकाप्रमुख संजय शिंदे, दिनेश आरणे, संदीप ईघे, नानक सावंत्रे आदींनी वाकचौरे यांचा निषेध करीत घोषणाबाजी केली.

शिंदे गटाकडून 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा सुरू होती. त्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटात गेले, त्यामध्ये शिर्डीचे वाघचौरे यांचा समावेश आहे. मी शिंदे गटाच्या संपर्कात नाही. ठाकरेंना मी सोडणार नाही. असे त्यांनी कधीही स्पष्ट केले नसल्याने त्यांच्याविषयी ठाकरे गटात संशयाचे वातावरण होते.

वाकचौरे यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात शिवसेनेपासून सुरू झाली. २००९ मध्ये शिर्डीची उमेदवारी शिवसेनेकडून घेत, काँग्रेसच्या रामदास आठवले यांचा त्यांनी पराभव केला. २०१४ व २०१९ या दोन्ही निवडणूकीत त्यांनी शिवसेना सोडत कॉग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश केला. त्यावेळी सदाशीव लोखंडे यांनी वाकचौरे यांचा पराभव केला. २०२४ मध्ये वाकचौरे यांनी पुन्हा ठाकरे गटाकडून निवडणूक लढवली. शिंदे गटाचे सदाशीव लोखंडे यांचा वाकचौरे यांनी पराभव केला.

#### मतदारसंघात फिरू देणार नाही

आमच्यातील काही गद्दार लोक वाकचौरे यांना मातोश्रीवर घेऊन गेले आणि उद्धव ठाकरे यांना सांगितले की, वाकचौरे यांनी माफी मागितली आहे. त्यांना पुन्हा लोकसभेसाठी संधी द्या. आम्ही निष्ठावान शिवसैनिक त्यांच्या प्रवेशाला विरोध करीत पुन्हा ऊमेदवारी देऊ नका असे उद्धव ठाकरे यांना सांगत होतो. वाकचौरे गद्दारी करतील त्यांच्यावर विश्वास ठेवू नये असेही आम्ही ठाकरे यांना सांगितले होते. वाकचौरे यांनी पुन्हा गद्दारी केली. त्याचा निषेध करतो. त्यांना मतदारसंघात फिरू देणार नाही.

-सचिन कोते, जिल्हाप्रमुख, ठाकरे गट

#### धोका देण्याची त्यांची जुनीच सवय

धोका देणे ही वाकचौरेंची जुनीच सवय आहे. मातोश्रीवर जाऊन खोटी शपथ घेत त्यांनी उमेदवारी मिळवली. त्यांनी पुन्हा एकदा मतदारांच्या विश्वासावर दरोडा टाकत पैशांसाठी दुसऱ्या पक्षात प्रवेश केला. शिवसेनेचे मशाल चिन्ह आणि उद्धव ठाकरेंचे आशीर्वाद होते म्हणूनच वाकचौरे खासदार झाले. अन्यथा त्यांना अनामत रक्कमही वाचवता आली नसती. हिंमत असेल तर त्यांनी राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवून दाखवावी.

-संजय शिंदे, तालुका प्रमुख, ठाकरे गट.

# सर्वजण सत्तेत, मग विरोधात कोण..?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षफुटी, बंडखोरी आणि सत्तेसाठी होणारी विचारांची देवाणघेवाण हा आता अपवाद राहिलेला नाही; उलट तो नवा राजकीय नियम बनत चालला आहे. गेल्या काही वर्षांत राज्याने अनेक राजकीय भूकंप अनुभवले. राष्ट्रवादी काँग्रेसची फूट, शिवसेनेतील ऐतिहासिक बंड आणि आता उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सहा खासदारांनी वेगळी वाट धरल्याची चर्चा. या घडामोडी केवळ एखाद्या पक्षाच्या अंतर्गत संकटाच्या नाहीत, तर भारतीय लोकशाहीसमोरील वाढत्या धोक्याच्या इशाऱ्याही आहेत.

शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नव्हता; ती एक विचारधारा, एक भावनिक ओळख आणि मराठी अस्मितेचे प्रतीक मानली जात होती. मात्र सत्तेच्या गणितांनी आणि वैयक्तिक राजकीय भवितव्याच्या चिंतेने त्या संघटनेची सलग दोनदा चिरफाड केली. प्रथम एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मोठा गट वेगळा झाला. त्यानंतर आता लोकसभेतील खासदारांच्याही गळतीने उद्धव ठाकरे यांना दुसरा मोठा धक्का बसला आहे. या घटनांमधून व्यक्तीपेक्षा सत्ता मोठी आणि विचारांपेक्षा पद महत्त्वाचे ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

या घडामोडींचे विश्लेषण करताना केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित राहून चालणार नाही. देशाच्या राजकारणात सध्या जे चित्र दिसत आहे, त्याचाच हा भाग आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर बोलावण्यात आलेल्या विशेष अधिवेशनात केंद्र सरकारला अपेक्षित यश मिळाले नाही. महत्त्वाची तीन विधेयके मंजूर होऊ शकली नाहीत. घटनादुरुस्ती किंवा व्यापक राजकीय परिणाम करणारी विधेयके मंजूर करण्यासाठी आवश्यक असणारे दोन तृतीयांश बहुमत सत्ताधारी आघाडीला मिळाले नाही. त्यानंतर अचानक देशभरात राजकीय हालचालींना वेग आला.

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमधील अस्वस्थता, महाराष्ट्रातील शिवसेनेतील फूट, दक्षिण भारतातील राजकीय समीकरणांमध्ये होणारे बदल आणि विविध प्रादेशिक पक्षांशी वाढलेली जवळीक या सर्व घटनांकडे स्वतंत्रपणे पाहता येणार नाही. राष्ट्रीय पातळीवरील बहुमताचे गणित जुळविण्याच्या प्रयत्नांचा हा भाग असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. राजकारणात योगायोग असतात; परंतु इतके सारे योगायोग एकाच वेळी घडू लागले की त्यामागील हेतू शोधणे अपरिहार्य ठरते.

या प्रक्रियेत सर्वात मोठा प्रश्न विरोधकांच्या अस्तित्वाचा निर्माण होत आहे. जर प्रत्येक राजकीय नेता सत्तेच्या मोहापायी किंवा चौकशी, कारवाई, खटले आणि तपास यांची भीती मनात ठेवून सत्ताधारी गटाच्या छत्राखाली जाणार असेल, तर विरोधी पक्षाची भूमिका कोण निभावणार? लोकशाहीमध्ये सत्ता आणि विरोधक हे दोन चाके आहेत. त्यापैकी एक चाक कमकुवत झाले तर संपूर्ण व्यवस्था डगमगते.

आज परिस्थिती अशी निर्माण होत आहे की सत्तेच्या विरोधात प्रश्न विचारण्याची जबाबदारी विरोधी पक्षांऐवजी पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांवर येऊन पडत आहे. हे कोणत्याही लोकशाहीसाठी आरोग्यदायी लक्षण नाही. संसद, विधानमंडळे आणि राजकीय पक्ष हे जनतेच्या प्रश्नांसाठी असतात. जर तेच सत्तेच्या केंद्रीकरणात गुंतले तर लोकांच्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व कोण करणार?

याहूनही चिंताजनक बाब म्हणजे निवडणुकांनंतर मतदारांचा कौल बदलण्याची वाढती प्रवृत्ती. जनता एका विचाराला, एका पक्षाला किंवा एका नेतृत्वाला मतदान करते; परंतु निवडून आल्यानंतर प्रतिनिधी वेगळ्याच गटात सामील होतो. अशा वेळी मतदारांच्या विश्वासाचे काय? लोकशाहीतील जनादेशाचे काय? निवडणूक हा केवळ उमेदवाराचा वैयक्तिक परवाना नसतो; तो मतदारांनी दिलेला वैचारिक करार असतो. हा करार वारंवार मोडला जात असेल तर लोकशाहीवरील विश्वास उध्वस्त होऊ लागतो. महाराष्ट्रात अलीकडच्या काळात बिनविरोध निवडींचा पायंडाही वाढताना दिसतो आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते विविध निवडणुकांपर्यंत स्पर्धा टाळण्याचा प्रयत्न होताना दिसतो. वरकरणी हा सौहार्दाचा मार्ग वाटू शकतो; परंतु दीर्घकालीन परिणामांचा विचार केला तर ही धोक्याची घंटा आहे. लोकशाहीचा आत्मा स्पर्धेत, मतभिन्नतेत आणि पर्यायांमध्ये असतो. बिनविरोध निवड हा अपवाद असू शकतो; पण तोच नियम बनू लागला तर मतदारांच्या निवडीचा अधिकारच हळूहळू संपुष्टात येईल.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील ताजी फूट ही केवळ एका नेत्याच्या राजकीय संकटाची कथा नाही. ती भारतीय राजकारणातील बदलत्या संस्कृतीचे प्रतीक आहे. विचारसरणी, पक्षनिष्ठा, कार्यकर्त्यांचे श्रम आणि जनतेचा विश्वास यापेक्षा राजकीय सुरक्षितता महत्त्वाची ठरू लागली आहे. हा कल थांबवला नाही तर उद्या कोणताही पक्ष, कोणताही नेता किंवा कोणताही विचार टिकणार नाही. उरेल ती केवळ सत्तेभोवती फिरणारी राजकीय गर्दी.

लोकशाहीचे खरे बळ विरोधकांच्या अस्तित्वात आहे. प्रश्न विचारणाऱ्या आवाजांमध्ये आहे. सत्तेवर अंकुश ठेवणाऱ्या संस्थांमध्ये आहे. म्हणूनच आज महाराष्ट्रासह देशातील जनतेने हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेजर सर्वच जण सत्तेकडे धाव घेणार असतील, तर विरोधात उभे राहून जनतेचा आवाज कोण उठवणार? हा प्रश्न केवळ उद्धव ठाकरे यांच्यासाठी नाही. तो प्रत्येक राजकीय पक्षासाठी आहे. प्रत्येक निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीसाठी आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो भारतीय लोकशाहीच्या भवितव्यासाठी आहे.

# कोटमारा धरणातील अनधिकृत पाणी उपशावर प्रशासनाचा बडगा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** बोटा गावासह परिसरातील नागरिकांना उन्हाळा व संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रशासनाने कोटमारा धरणातील अनधिकृत पाणी उपशावर धडक कारवाई केली आहे. संगमनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्या निर्देशानुसार जलसंपदा विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाने संयुक्तपणे मोहीम राबवून धरणातील बेकायदेशीर पाणी उपसा पूर्णपणे बंद केला. त्यामुळे धरणातील उपलब्ध पाणीसाठा आता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आला असून बोटा परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करून ग्रामविकास अधिकारी सुनील बोरवे यांनी पिण्याच्या पाण्याच्या विहिरीजवळ मोठा खड्डा तयार केला. धरणातून सोडण्यात येणारे पाणी या खड्ड्यात साठवून ते जमिनीतून झिरपत मुख्य विहिरीत पोहोचत असल्याने विहिरीची पाणीपातळी वाढली आहे. परिणामी गावाला नियमित व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू ठेवणे शक्य झाले आहे.

कोटमारा धरणातून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पाणी उपसा होत असल्याच्या तक्रारीनंतर जलसंपदा विभागाचे उपअभियंता असाद शेख, प्रकाश आभाळे व ग्रामपंचायत अधिकारी सुनील बोरवे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून धरणातील बेकायदेशीर वीजपंप व पाइपलाइन हटविण्याची कारवाई केली. यामुळे धरणातील पाणी आता केवळ पिण्याच्या गरजांसाठी उपलब्ध राहणार आहे.

या मोहिमेत बोटा गावचे माजी उपसरपंच संतोष शेळके, खंडू जाधव, अमित शेळके, अमित कुलकर्णी तसेच कुरकुडवाडी, आंबी येथील सरपंच आणि ग्रामस्थांनी प्रशासनाला सक्रिय सहकार्य केले.

प्रशासनाचे नियोजन, जलसंपदा विभागाची तत्परता आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे बोटा गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही केली आहे.



# विविध उपक्रमांनी ना. राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या जन्मदिनानिमित्त टाकळीभान येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त संत शिरोमणी सावता महाराज मंदिर येथे सुरू असलेल्या आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील अनाथ मुलांसाठी १०० किलो गहू, ५० किलो बाजरी, ३० किलो तांदूळ, बिस्किट पुडे व केळी देण्यात आली.



यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार व उपस्थित पदाधिकारी यांच्या हस्ते साहित्य वाटप होऊन हभप कृष्णा महाराज वाघुले यांचा सन्मान करण्यात आला. तसेच ना. साहेबांच्या जन्मदिनानिमित्त टाकळीभान जि प प्राथ. शाळेतील विद्यार्थी व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना बिस्कीट पुढे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवगंताचा गुलाब पुष्प देऊन स्वागत सोहळा संपन्न झाला. त्याचप्रमाणे जि प प्राथ. शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तक वाटपाचा कार्यक्रमही संपन्न झाला. याप्रसंगी मा. सरपंच चित्रसेन रणनवरे, उपसरपंच कान्हा खंडागळे ,माजी चेअरमन राहुल पटारे, माजी चेअरमन एकनाथ पटारे, टाकळीभान सोसायटीचे व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, तंटामुक्ती उपाध्यक्ष अनिल दाभाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश कोकणे, रोहिदास पटारे, सुधीर मगर, अक्षय कोकणे, भाऊसाहेब पटारे, बाबासाहेब गायकवाड, अनिल पटारे, बंडूपंत हापसे, जि प प्राथमिक शाळा शिक्षक वृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिंगवेतुकाईच्या जि.प.शाळेमध्ये आरोग्य तपासणी करून प्रवेशोत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील शिंगवेतुकाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकतेच नवीन प्रवेशोत्सव आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नवागतांचे आरोग्य तपासणी करून प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनाथ महाराज होंडे हे होते.



या शिबिरात बालकांची आरोग्य तपासणीचे आयोजन ग्रामिण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.रामेश्वर काटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. या तपासणी शिबिरासाठी प्रमुख वैद्यकीय अधिकारी म्हणून मेडिकल ऑफिसर डॉ. विजयकुमार आवारे व डॉ. मिनाक्षी उद्धव हरिश्चंद्रे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित सर्व मुलांची अत्यंत बारकाईने आरोग्य तपासणी केली.

बदलत्या हवामानानुसार मुलांनी आरोग्याची कशी काळजी घ्यावी, याबाबत डॉ. आवारे व डॉ. हरिश्चंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी औषध निर्माण अधिकारी सारंग राऊत यांनी विद्यार्थ्यांना औषधांचे वाटप व त्यांच्या वापराबाबत माहिती दिली. तसेच वसंत कांगुणे यांनी ही या मोहिमेत महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी बालकांना शालेय साहित्य आणि गणवेश वाटप योगेश सुरेश होंडे,माजी सरपंच शिंगवे तुकाई, दीपक उद्धव पवार,अध्यक्ष शालेय समिती, भाऊसाहेब श्रीपती धायबर,केरू अहिलाजी गवळी, सुनील विधाटे, योगेश गुंड, कानीफ पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रवेशोत्सव आणि आरोग्य तपासणी साठी नियोजन हे शिबिर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. गिरी योगिता रतन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

# पुणतांबा -जळगाव शिवरस्त्याची दयनीय अवस्था

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** परिसरातील जळगाव रामपूरवाडी येलमवाडीचांगदेव नगर पुणतांबासह अनेक गावातील ग्रामस्थांना दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पुणतांबा -जळगाव या अंदाजे पावणेतीन किमीवर लांबीच्या रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे.



६० फूट रुंदीचा हा रस्ता अतिक्रमणामुळे सध्या अनेक ठिकाणी अवघा ६ फूट रुंदीचा झाला आहे ह्या रस्त्याच्या रूंदीकरण मजबूती करणासाठी ग्रामस्थांनी अनेक वर्षापासून सातत्याने मागणी केली आहे.

मात्र लोकप्रतिनिधीचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे. २०१२ राहात्याचे तात्कालिक तहसीलदार अप्पासाहेब शिंदे यांनी लक्ष घालून १ किमीवर लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरण करून साई पट्ट्यांची खोली केली होती. मात्र पुढे काही शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतर रस्त्याचे काम बंद पडले होते. एक महिन्यापूर्वी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निधितून ६० वर्षानंतर ३०० मीटर खडीकरणाचे थोडे काम झाले आहे. सध्या तरी या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे. तसेच काही ठिकाणी वेडया बाभळींनी अतिक्रमण केले आहे. या रस्त्याची रुंदीकरण करून मजबूती करण करण्याची ग्रामस्थांनी पुन्हा मागणी केली आहे.

# विखे परिवारामुळे विद्यार्थीनीचे आयुष्य उजळले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी :** लहानपणापासून कर्णबधीर असलेल्या उंचखडक बु. येथील प्रिया कातोरे (वय ८) या विद्यार्थिनीच्या आयुष्यात अखेर आनंदाचे सूर उमटले आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकारातून प्रियाला कानाचे मशीन उपलब्ध करून देण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंचखडक बु. येथे शिकणाऱ्या प्रियाला जन्मापासूनच ऐकू येत नव्हते. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने तिच्या पालकांना उपचार करणे शक्य नव्हते. अनेक वर्षे प्रशासन, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करूनही मदत मिळाली नव्हती. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे यांनी हा प्रश्न अकोले विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष विकास वाकचौरे याच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर हा विषय विखे पाटील यांच्यापर्यंत पोहोचला आणि प्रियासाठी तत्काळ ब्रँडेड कानाचे मशीन उपलब्ध करून देण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी मशीन बसवल्यानंतर प्रियाला स्पष्ट आवाज ऐकू येऊ लागला. वर्गातील मुलांचा गोंधळ, शिक्षकांचे बोलणे आणि प्रश्न ऐकून तिच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. वर्गशिक्षिका क्षीरसागर मॅडम यांनी विचारलेल्या प्रश्नांची ती आत्मविश्वासाने उत्तरे देताना दिसली. या मदतीमुळे प्रियाच्या शिक्षणाचा मार्ग अधिक सुकर झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पुणतांब्यात हातभट्टीवर कारवाई

## ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर :** राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील कुंभारवाडा परिसरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुधवारी (दि. १७) धडक कारवाई करत हातभट्टी दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेला साहित्यसाठा जप्त केला. या कारवाईत ८० हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर धोमकर, अधीक्षक प्रमोद सोनोने, ऋषिकेश इंगळे व उपअधीक्षक प्रवीणकुमार तेली यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे दोन पंचांच्या उपस्थितीत पुणतांबा येथील स्मिता किराणा स्टोअरवर छापा टाकण्यात आला.

कारवाईदरम्यान हातभट्टी दारू निर्मितीसाठी वापरला जाणारा १,६६२ किलो काळा गूळ, नवसागर व अन्य साहित्य असा एकूण ८०,७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी राजेंद्र सखाराम जगदाळे (रा. कुंभार गल्ली, पुणतांबा) व इतरांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक वाय. बी. पाटील करीत आहेत. अवैध मद्यनिर्मिती व तस्करीविरोधातील मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

# खंडाचे पैसे मागितल्याने वृद्ध महिलेला धमकी

## घारगाव पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** शेतीच्या खंडाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून ६० वर्षीय वृद्ध महिलेला फोनवरून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना संगमनेर तालुक्यातील नांदूर येथे घडली. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विमल रामभाऊ भागवत (वय ६०, रा. नांदूर) या एकट्या राहतात. त्यांची तीन एकर शेती त्यांचा चुलत भाचा चंद्रकांत संपत सुपेकर हा गेल्या तीन वर्षांपासून खंडाने कसत आहे. १५ जून रोजी रात्री विमल भागवत यांनी चंद्रकांत याला फोन करून खंडाच्या थकीत पैशांची मागणी केली. त्यावेळी संतप्त झालेल्या चंद्रकांतने फोनवर अश्लील शिवीगाळ केली. तसेच, शेती दुसऱ्याला दिलीस तर तुझ्याकडे बघून घेईन, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

यामुळे घाबरलेल्या वृद्ध महिलेने घारगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३५१(४) अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब बोरसे करीत आहेत.

# गोणेगाव चौफुला येथे रामकृष्ण महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्याला भाविकांची मांदियाळी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी अध्यात्मिक केंद्राचे संस्थापक व वारकरी संप्रदायातील विभूती वैकुंठवाशी गुरुवर्य रामकृष्णजी महाराज काळे यांच्या २६ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आळंदी येथील भगवान महाराज कराड यांचे किर्तन झाले.झालेल्या किर्तन सोहळयाला संत महंतांसह भाविकांची मोठी मांदियाळी जमली होती.



यावेळी झालेल्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांतचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी रामकृष्ण आश्रमाला भेट दिली. कीर्तन सोहळयाच्या कार्यक्रम प्रसंगी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी महंत स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, भगवान महाराज कराड आळंदीकर,श्री विठ्ठल रुख्मिणी आश्रमाचे प्रमुख भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते गुरुवर्य रामकृष्णजी महाराज काळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलतांना स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज म्हणाले, गुरुवर्य रामकृष्ण गुरुजींनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनेक कीर्तनकार घडवले. ते त्यागी जीवन जगले मला देखील त्यांच्या आश्रमात सेवा करण्याची संधी मिळाली मी माझे भाग्यच समजतो. याप्रसंगी आळंदी येथील हभप भगवान महाराज कराड यांचे हरिकिर्तन झाले. रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते उपस्थित महंतांचे संतपूजन करण्यात आले.

पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी बीड वांगी स्वामी निर्मलनाथ देवस्थान वांगी महंत अभिदानंद महाराज, बाळकृष्ण महाराज दिघे, नंदकिशोर महाराज खरात, संतोष महाराज चौधरी, वामन महाराज माकोणे, चांगदेव महाराज काळे, निलेश महाराज रोडे, ऋषिकेश महाराज वाकचौरे, आदिनाथ महाराज भोगे, अंजाबापू महाराज कर्डीले, बाळकृष्ण महाराज कुलकर्णी, आचार्य भगवान महाराज, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, राजेंद्र महाराज आसने, गणेश महाराज गायकवाड, बदाम महाराज पठाडे, सचिन महाराज पवार, हरि महाराज भोगे, गायनाचार्य महादेव महाराज आव्हाड, नामदेव महाराज कंक यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवांकुर ग्रुपच्या सर्व विद्यालयांत नवगतांचे उत्साहात स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** साक्षरतेचा एकच मंत्र, शिक्षण देणे हेच तंत्र या उक्ती प्रमाणे राहुरी तालुक्यातील सुरू असलेल्या शिवांकुर ग्रुपच्या, शिव प्रतिष्ठान संचलित शिवांकुर विद्यालय कोंढवड, शिवांकुर रेन्बो स्कूल राहुरी, तसेच शिवांकुर विस्डम स्कूल खडांबे या ठिकाणी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

शिवांकुर विद्यालया मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले'' शिक्षण हे माध्यम समाजात बदल घडवून आणण्याचे प्रमुख शस्त्र आहे असे प्रतिपादन संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश पवार यांनी केले. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले तसेच इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन पुस्तकाचे वाटप करण्यात आले.




प्रसंगी नूतन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ रावसाहेब पवार, विश्वस्त मंगल पवार, डॉ गौरी पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका पांढरे व आभार प्रदर्शन शितल फाटक यांनी केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका छाया जाधव, पर्यवेक्षक अरुण खिलारी, किरण तारडे, सचिन जाधव, भाऊसाहेब करपे, विजय शिंदे, मयूर धुमाळ, ज्योती शेळके, सुरेखा मकासरे, प्रियंका पांढरे, शितल फाटक, अनिता लांबे, दुर्गा बारवेकर, सुनीता ढोकणे, प्रियंका शेळके, कविता कल्हापुरे, अनिता म्हसे, शिपाई शारदा तमनर, ड्राइवर अशोक गाडे, अविनाश तनपुरे, नवनाथ गाडे, पिनू आहिरे, नंदु गिरी, कैलास गडधे, भैय्यासाहेब चौधरी, अनिल गुंजाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नूतन विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रसंगी शिवांकुर विस्डम स्कुलच्या श्रध्दा सोनवणे, स्वाती लहारे, मनीषा कोकाटे मॅडम, शुभम अहिरे आदींसह अनेक पालक उपस्थित होते.

नूतन विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रसंगी शिवांकुर रेनबो स्कूलच्या कावेरी शेळके, रितु चाकोते, जयश्री देशमुख मॅडम शिपाई आरती वाघ आदींसह बहुसंख्य पालक व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## मातापूर येथे नवागतांचे स्वागत



**श्रीरामपूर** : खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल मातापूर या विद्यालयात इयत्ता पाचवी, सहावी, सातवी आठवी व नववी या वर्गातील नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, चॉकलेट, वही, पेन, शासनाचे मोफत पुस्तके देऊन विद्यालयाच्यावतीने नवागताचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब उंडे, शालेय समिती उपाध्यक्ष बाबासाहेब कासार, प्रकाश उंडे, आप्पा शिरोळे, उपसरपंच शीलाताई शिरोळे, कमलताई दोंड, माजी विद्यार्थी मनोहर शिरोळे, निखिल गायके, स्वप्निल शिरोळे पालक भारत दोंड, अनिल पोते, गणपत शिरोळे आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी विद्यालयाची शालेय शिस्त शंभर टक्के निकालाचे भरभरून कौतुक केले.

## कोपरगावात राष्ट्रवादीच्या वतीने राजमाता जिजाऊ यांना अभिवादन



**कोळपेवाडी** : स्वराज्याच्या शिल्पकार तथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त कोपरगाव शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.

यावेळी नगरसेविका गटनेत्या गौरी पहाडे, निर्मला आढाव, माजी नगरसेविका मायादेवी खरे, नगरसेवक मेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, इम्तियाज अत्तार, शैलेश साबळे, संदिप कपिले, बाळासाहेब रुईकर, मंदार पहाडे, सोमेश आढाव, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक प्रदीप कुऱ्हाडे, माजी नगरसेवक रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, उमेश दिक्षित आदींसह नागरिक उपस्थित होते.

## मक्तापुर साळवे वस्ती जि प शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत



**नेवासा** : तालुक्यातील मक्तापूर येथे जिल्हा परिषद शाळा साळवे वस्ती येथे इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठया उत्साहात स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित नवीन मुलामुलींना पुस्तके,कपडे,शालेय साहित्याचे मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी बोलतांना गणेश झगरे म्हणाले की जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण मिळणार असल्याने आपल्या पहिलीच्या मुलांना आपण आनंदाने शाळेत पाठवा,सध्याच्या परिस्थितीमध्ये जिल्हा परिषद शाळा मुलांची संख्या कमी असून ही संख्या वाढविणे सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले यावेळी रवी माहेगावकर व शिक्षिका सीमा यांनी पहिलीत प्रवेश घेणाऱ्या मुलांचे स्वागत केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी दीपक साळवे, बाळासाहेब शिरसाठ,प्रदीप साळवे,अमोल शिरसाठ, सुनील गव्हाणे,संदीप बर्डे,सुरेश बर्डे,दादासाहेब बर्डे, रावसाहेब गव्हाणे,सोमनाथ गायकवाड,सचिन गायकवाड, मोहन खैरे, सुदर्शन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेतर,शिक्षक शकूर इनामदार,दिगंबर कांगुणे, मनोज झगरे अविनाश बर्डे यांच्यासह मक्तापूर ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुणे शिर्डी थेट रेल्वे म्हणजे विकासाचा नवा ट्रॅक ; सुजय विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : पुणे ते शिर्डी दरम्यान पहिल्यांदाच थेट रेल्वेसेवा सुरू होत असून, यामुळे साईभक्तांसह हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत या नव्या रेल्वेसेवेचे उद्घाटन आज बुधवारी (१७ जून) करण्यात आले. भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

ते म्हणाले, शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. पुण्याहून मिळालेल्या या पहिल्या थेट रेल्वे सुविधेमुळे लाखो भाविकांची मोठी सोय होणार असून धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल. डॉ. सुजय विखे यांनी पुणे-शिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकासाचे कौतुक केले.

ते म्हणाले की, गेल्या काही वर्षांत रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडून आले असून नवीन रेल्वेमार्ग, आधुनिक स्थानके, वंदे भारतसारख्या अत्याधुनिक गाड्या आणि प्रवाशांसाठी वाढलेल्या सुविधा यामुळे भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे.पुणे-शिर्डीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर थेट रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्यामागे केंद्र सरकारची विकासाभिमुख भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांना जोडण्यावर विशेष भर दिला जात आहे. पुणे-अहिल्यानगर-शिर्डी रेल्वेसेवा ही त्याच दृष्टीकोनाचा भाग असून यामुळे भाविक, विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिक यांना मोठा फायदा होणार आहे.

रेल्वे नेटवर्कच्या विस्तारामुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून विकसित भारताच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचेही डॉ. सुजय विखे यांनी सांगितले. दररोज धावणारी ही रेल्वे पुणे, अहिल्यानगर, राहुरी, श्रीरामपूर मार्गे शिर्डीपर्यंत धावणार आहे. त्यामुळे केवळ भाविकांच्याच नव्हे तर विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिकांच्याही प्रवासाचा वेळ व खर्च कमी होणार आहे. पुण्यातील शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांपर्यंत पोहोचणे ता अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील नागरिकांसाठी अधिक सुलभ होणार आहे. यापूर्वी पुण्यातून शिर्डीसाठी थेट आणि नियमित रेल्वे उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रवाशांना बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय निवडावा लागत होता. नव्या रेल्वेसेवेमुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर होणार आहे.

दरवर्षी देश-विदेशातून लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. अशा परिस्थितीत पुणे-शिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याने धार्मिक पर्यटन, व्यापार, दळणवळण आणि प्रादेशिक विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.

## गुणवंत कामगार पुरस्काराबद्दल सुखदेव फुलारी यांचा सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कामगार संचालक व सीनियर डिस्टिलरी केमिस्ट सुखदेव फुलारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळामार्फत देण्यात येणारा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जनरल मॅनेजर रविंद्र मोटे,अशोकराव मिसाळ, प्रशासकीय अधिकारी कल्याणराव म्हस्के, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, विलास लोखंडे,दत्तात्रय माळवदे, दत्तात्रय खाटीक, संदीप फुलारी, विजय गुळस्कर, कामगार संघटनेचे सचिव संभाजीराव माळवदे, सतीष शिंदे, आदि यावेळी उपस्थित होते. तसेच श्रीक्षेत्र देवगड येथे नागेबाबा परिवारचे वतीने महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते श्री.फुलारी यांचा सत्कार करण्यात आला. नागेबाबा परिवाराचे प्रमुख कडूभाऊ काळे, तुकाराम मिसाळ,शिवाजीराव तागड, संजय मनवेलीकर, बापूसाहेब नजन, सुनील गव्हाणे, देविदास गव्हाणे, अजित रसाळ, गणेशदेवा कुलकर्णी,रंगनाथ गव्हाणे,सुभाष चौधरी,राजेंद्र चिंधे, वाल्मीक लिंगायत आदि यावेळी उपस्थित होते.

## मृग नक्षत्र कोरडे; पावसाअभावी शेतकरी चिंतेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी व परिसरातील शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत असून पाऊस लांबल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील कपाशी, सोयाबीन व मका पिकांच्या लागवडीला विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

यंदा परिसरात कपाशी व मका पिकाचे क्षेत्र वाढण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी आधीच मशागत करून शेतजमीन तयार ठेवली आहे. तसेच कपाशी, मका आणि सोयाबीन बियाण्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मात्र समाधानकारक पाऊस न झाल्याने बहुतांश शेतकरी पेरणीस धजावत नसल्याचे चित्र आहे. मागील वर्षीचा अपुरा पाऊस, तीव्र उन्हाळा आणि धरणांतील घटती पाणीपातळी यामुळे विहिरी व बोअरवेलने तळ गाठला आहे. मध्यंतरी भंडारदरा धरणाच्या उजव्या कालव्यातून मर्यादित प्रमाणात आवर्तन सोडण्यात आले. त्यामुळे कालव्यालगतच्या काही विहिरी व बोअरवेलमध्ये तात्पुरती पाणीवाढ झाली.

या पाण्याच्या आधारे काही शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली असली तरी बहुसंख्य शेतकरी अद्यापही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. रोहिणी नक्षत्रानंतर मृग नक्षत्राचाही मोठा कालावधी कोरडा गेल्याने शेतकऱ्यांच्या आशा धूसर होत आहेत. वातावरणातील उष्णता कायम असून मोसमी वाऱ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसून येत नाहीत. त्यामुळे मान्सूनच्या प्रगतीबाबत अनिश्चितता वाढली आहे.याबाबत चिंता व्यक्त करताना झरेकाठी येथील प्रगतीशील व उपक्रमशील शेतकरी तथा डॉ. सुजयदादा राधाकृष्ण विखे पाटील प्रणित जनसेवा युवा मंचचे सदस्य भिकाजी वामन वाणी म्हणाले की, पावसाअभावी शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. शेतीसाठी पुरेसा पाऊस होणे अत्यावश्यक आहे. पंढरपूर यात्रेच्या पार्श्वभूमीवर बळीराजाच्या हितासाठी लवकरच भरपूर पाऊस पडावा, अशी प्रार्थना पांडुरंगाच्या चरणी केली जात आहे.

## रेशन कार्डधारकांनी दलालांच्या भुलथापांना बळी पडू नका; तहसीलदार डॉ. पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**उंबरे** : राहुरी तालुक्यातील सर्व नागरिकांना व रेशन कार्डधारकांना आवाहन करण्यात येते की, रेशन कार्ड संदर्भात कोणतेही काम म्हणजेच नाव कमी करणे, नाव समाविष्ट करणे,धान्याचा लाभ मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करणे, दुबार रेशन कार्ड काढणे,आदी कामासंदर्भात कोणत्याही दलालाच्या भूलथापाला बळी न पडता स्वतःहा किंवा महा -ई सेवा (सेतू) केंद्राच्या माध्यमातून अर्ज सादर करावेत, असे आवाहन राहुरीचे तहसीलदार डॉ.अमित पवार व पुरवठा निरीक्षण अधिकारी सुदर्शन केदार यांनी आवाहन केले.

महाराष्ट्र शासनाच्या जुलै २०१३ ते नोव्हेंबर २०१३ मधील निर्णयानूसार धान्य लाभासाठी तहसील कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज संबंधित गावच्या ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेच्या मंजुरीसाठी पाठवले जातात, संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये मंजूर झालेली अर्ज तहसील कार्यालयाला प्राप्त झाल्यावर संबंधित लाभार्थ्यांना धान्याचा लाभ मंजूर केला.या कार्य प्रणालीमुळे गेल्या वर्षभरात पुरवठा विभागा मार्फत ७ हजारापेक्षा अधिक गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना धान्याचा लाभ दिला गेला आहेत. त्याचप्रमाणे शिधापत्रिका संदर्भात विविध अर्ज सार्वजनिक संकेत स्थळा द्वारे प्राप्त होत असून त्यावर विहित मुदतीत कार्यवाही केली जाते,त्यामुळे नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयात येण्याची गरज नाही.

वशेषता वैद्यकीय कामासाठी आवश्यक असलेली प्रकरणे तत्काळ मार्गी लावली जात असून पुरवठा विभागातील कामकाज वेळेत व मुदतीत पूर्ण होत असल्याने शिधापत्रिका धारक लाभार्थी व्यक्ती पुरवठा विभागाच्या कामकाजाप्रती समाधान व्यक्त करत आहेत. पुरवठा विभागाबरोबरच संजय गांधी निराधार योजना, वृद्धपकाळ पेन्शन योजना, लाडकी बहिण योजना, पी.एम. किसान,नमो शेतकरी, योजना तसेच अन्य विभागाशी संबंधित कामासाठी काही व्यक्ती दलाली करून तसेच भूलथापा देऊन नागरिकाकडून ज्यादा पैसे उकळत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत, नागरिकांनी अशा ढोंगी व फसवेगिरी करणाऱ्या दलाल व्यक्तीपासून सावध राहावे, तसेच कोणत्याही आर्थिक स्वरूपाचा त्यांच्याशी व्यवहार करू नये, असे आवाहन तहसीलदार डॉक्टर अमित पवार व पुरवठा निरीक्षण अधिकारी सुदर्शन केदार यांनी केले.


### जाहीर नोटीस

ॲड. ए.पी. उंबरकर
ने.ता. १०/०७/२०२६
दिवाणी न्यायालय व. स्तर राहाता
नि.६

राहाता येथील मे. सिव्हिल जज साहेब (सि.डी.) यांचे कोर्टात...
वारस चौ. अर्ज नंबर ३६/२०२६

१. अनिल एकनाथ कडु,
वय ४३ वर्षे धंदा - शेती, मो.नं. ८००७५१४३३५
२. योगेश एकनाथ कडु,
वय ४१ वर्षे धंदा - शेती, मो.नं. ९३०७३८७५४७
वरील दोघेही रा. कडु वस्ती, पाथरे बु. ता. राहाता,
जि. अहिल्यानगर - **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही---सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार हे वरील दिलेल्या पत्त्यावरील कायम रहिवाशी आहे. अर्जदार यांचे जनक वडील एकनाथ भिकाजी कडु हे दि. १५/०३/२०२० व आई निर्मला एकनाथ कडु या दि. २६/०४/२०१० रोजी मयत झालेले आहेत. मयतांना अर्जदार हेच दोन मुले वारस आहे. मयताचे नावावर खालील ननूद कंपन्याचे शेअर्स सर्टीफिकेट नावे आहेत.

| | कंपनी नाव | Client ID | शेअर्स संख्या | दर्शनी किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | भारत फोर्ज | ८०४९८४७२ | ६४० | प्रत्येकी रु २ |
| २ | बी. एफ. युटीलिटीज लि. | ८०४९८४७२ | ६४ | प्रत्येकी रु ५ |
| ३ | बी. एफ. इन्व्हेस्टमेंट लि. | ८०४९८४७२ | ६४ | प्रत्येकी रु ५ |

त्याअर्थी, अर्जदार यांचे वडील एकनाथ भिकाजी कडु हे दि. १५/०३/२०२० व आई निर्मला एकनाथ कडु या दि. २६/०४/२०१० रोजी मयत झाल्या असून त्यांना अर्जदार हेच वारस असलेबाबत व मयताचे नावे वरील शेअर्स सर्टीफिकेट बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग राहाता यांचे समक्ष दि. १०/०७/२०२६, रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे अन्यथा पुढिल हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७ /०६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे.

तयार करणार
वरिष्ठ लिपीक
शिक्का
हुकूमावरून
सह अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर राहाता



### राहुरी नगरपरिषद, राहुरी, जि. अहमदनगर
### नगर रचना विभाग

जा. क्र. कावी ३/ १०७ /२०२६ — दिनांक १७/०६/२०२६

**जाहिर निविदा सुचना**

मा. मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद यांचेकडुन नगर रचना विभागासाठी BPMS Portal करीता तांत्रिक अभियंता (System Suport Engineer) या पदासाठी फर्म मार्फत सदर पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असलेल्या अभियंता यांचे कडुन खालील प्रमाणे निविदा / दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फि | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | राहुरी नगरपरिषदेच्या नगर रचना विभागाकडील BPMS Portal साठी दैनंदिन समस्यांचे निराकरण करण्यासाठी तांत्रिक अभियंता (System Suport Engineer) पुरविणे / नेमणुक करणे. | ५००/- | ५००/- | ११ महिने |

**नियम व अटी** :

**१**. कोरे निविदा नमुने विक्री दिनांक १८/०६/२०२६ ते दिनांक २४/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख किंमतीस विकत मिळतील. मोहरबंद निविदा दिनांक २४/०६/२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत स्विकारल्या जातील. प्राप्त निविदा दिनांक २४/०६/२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. संबंधीत मक्तेदार / प्रतिनिधी यांचे समक्ष मा. मुख्याधिकारी यांचे दालनात अथवा मे. प्रशासकीय सभेत उघडल्या जातील.
**२**. निविदा इसारा रक्कम रोख स्वरुपात भरावी लागेल.
**३**. नमुद पद हे कंत्राटी स्वरुपाचे असुन इतर सविस्तर अटी व शर्ती नगर रचना विभाग राहुरी नगरपरिषद येथे पहावयास मिळतील.

XXX
पंकज मेहेत्रे
रचना सहायक
राहुरी नगरपरिषद, राहुरी

XXX
अभिजीत हराळे
मुख्याधिकारी
राहुरी नगरपरिषद, राहुरी



### राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर
### लेखा विभाग
### निविदा सुचना

दिनांक - १७/०६/२०२६

राहुरी नगरपरिषदेचे लेखा विभागांतर्गत कामे पार पाडण्यासाठी खालील नमूद केलेप्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | नगरपरिषदेचे सन २०२५-२६ ते २०२७-२८ या आर्थिक वर्षाचे लेखे द्विनोंद पद्धतीने तयार करणेसाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे. |
| २ | सन २०२६-२७ ते २०२७-२८ करिता आयकर, GST, व्यवसायकर तसेच इतर लागू असलेले शासकीय करांबाबत मार्गदर्शन, परतावे दाखल करणे तसेच नगरपरीषदेद्वारे बाजू मांडणेसाठी अधिकृत कर सल्लागाराची नेमणूक करणे. |

**१**) सदर निविदेचा फॉर्म संबंधित विभागात दि. १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विक्री साठी उपलब्ध राहतील.
**२**) निविदा फॉर्म शुल्क, निविदा बयाना व निविदेच्या अटी व शर्ती निविदा फॉर्मसोबत अंतर्भूत केलेल्या आहे. त्यानुसार निविदा फॉर्म फी व निविदा बयाना भरलेनंतर निविदा फॉर्म देण्यात येईल.
**३**) निविदा धारकाने दि. १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत निविदा भरणे आवश्यक राहील. या वेळेनंतर सादर झालेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.
**४**) तरी इच्छुक निविदा धारकांनी विहित मुदतीत निविदा सादर कराव्यात.
अधिक माहितीसाठी लेखा विभागाशी संपर्क साधावा.

मुख्याधिकारी
राहुरी नगरपरिषद, राहुरी.

अध्यक्ष
राहुरी नगरपरिषद, राहुरी.


# महावितरणाच्या ढिसाळ कारभारावर आमदार आशुतोष काळे आक्रमक

## विजेचे वाकलेले पोल आणि वीज वाहिन्या तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : मागील महिन्यात तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने धामोरी गावासह परिसरात अनेक ठिकाणी विजेचे पोल जमिनीला टेकले आहेत तर अनेक पोल वाकले होते तर अनेक ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे कोसळल्यामुळे वीज वाहिन्या तुटून शेतात पडल्या आहेत तर काही ठिकाणी अजूनही लोंबकळत आहेत ज्या सहजपणे हाताला लागतात.जवळपास तीन आठवड्यांचा कालावधी होवूनही महावितरणकडून हे पोल सरळ करण्याचे आणि वीज वाहिन्यांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नसून सुरु असलेले दुरुस्तीचे काम अतिशय कमी मनुष्यबळात अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे दिसून आल्यामुळे आमदार आशुतोष काळे संतप्त झाले.

त्यांनी आक्रमक पवित्रा घेत महावितरणाच्या उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंत्याला आणि ठेकेदाराला कडक शब्दात चांगलेच सुनावले आहे. आमदार आशुतोष काळे यांनी मंगळवार (दि.१६) रोजी मागील महिन्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे विजेचे पोल व वीज वाहिन्यांच्या झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीच्या कामाची नागरीकांसमवेत प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी तीन आठवड्याच्या कालावधीत महावितरणकडून दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नसल्याचे व ठिकठिकाणी वाकलेले पोल व जमिनीलगत पडलेल्या वीज वाहिन्या व काही ठिकाणी लोंबकळत असणाऱ्या वीज वाहिन्या ज्या सहजासहजी हाताला लागतील अशा परिस्थितीत



दिसून आल्यामुळे आमदार आशुतोष काळे चांगलेच संतापले होते.

वाकलेले पोल व लोंबकळत असणाऱ्या वीज वाहिन्या तुम्हाला दिसत नाही का? तुमच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांना व वीज ग्राहकांना किती अडचणींचा सामना करावा लागतो याची जाणीव आहे का? ऑफिसमध्ये बसून तुम्हाला शेतकऱ्यांच्या अडचणी समजणार नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात जागेवर जावून परिस्थितीची पाहणी करा आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काम किती तातडीने पूर्ण झाले पाहिजे याचा गांभीर्याने विचार करा. दुरुस्तीचे काम किती मोठे आहे त्या कामासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून न देता केवळ दोन ते तीनच कामगार दुरुस्तीच्या कामासाठी देता यावरून तुम्हाला वीज ग्राहकांच्या अडचणींशी काहीच देणे घेणे नाही असे दिसते. मात्र यापुढे असा ढिसाळ कारभार मला चालणार नाही.

नागरीकांच्या तुमच्या बाबतीत पुन्हा तक्रारी आल्यास त्याचे परीणाम तुम्हाला भोगावेच लागतील अशा कडक शब्दात आमदार आशुतोष काळे यांनी महावितरणाच्या उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंत्याला आणि ठेकेदाराची कान उघाडणी केली. तसेच कार्यकारी अभियंत्याला पाहणी दरम्यान भ्रमणध्वनीवरून आवश्यक साहित्य, मनुष्यबळ व यंत्र सामुग्री तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. येत्या काही दिवसात पावसाला सुरवात होणार असून वाकलेले पोल आणि लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्यांमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे पाऊस सुरु होण्यापूर्वी रवंदे, मळेगाव थडी, सांगवी भुसार, मायगाव देवी आणि धामोरी गावातील काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना आ.आशुतोष काळे यांनी महावितरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहे.कामचुकार अधिकाऱ्यांच्या बाबतीत आमदार आशुतोष काळे यांच्या या भूमिकेचे नागरीकांनी स्वागत केले असून नाठाळ अधिकाऱ्यांना यापुढे नागरीकांच्या अडचणी सोडविण्यासाठी चालढकल करता येणार नाही.

# पान १ वरुन

## एनडीए दोन तृतीयांश बहुमताच्या उंबरठ्यावर?

अशी चर्चा सुरू आहे. काही प्रादेशिक पक्षांनी अद्याप कोणत्याही नव्या आघाडीबाबत स्पष्ट भूमिका घेतलेली नसली तरी संसदेतील मतदानाच्या वेळी त्यांची भूमिका निर्णायक ठरू शकते.राजकीय सूत्रांच्या मते, घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केवळ अधिकृत संख्याबळच नव्हे तर मतदानावेळी उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची संख्या देखील महत्त्वाची असते. काही सदस्य अनुपस्थित राहिल्यास किंवा तटस्थ भूमिका घेतल्यास सत्ताधाऱ्यांना आवश्यक बहुमताचा मार्ग अधिक सुलभ होऊ शकतो. त्यामुळे आगामी अधिवेशनात केवळ सरकार-विरोधक संघर्षच नव्हे तर पडद्यामागील राजकीय रणनीतीदेखील केंद्रस्थानी राहणार आहे.पावसाळी अधिवेशनात महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना, निवडणूक सुधारणा आणि आगामी राजकीय आघाड्यांच्या चर्चांमुळे संसदेचे वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे जुलै महिन्यातील हे अधिवेशन देशाच्या राजकीय भवितव्यासाठी महत्त्वाचे ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सहा खासदार 'ऑपरेशन टायगर'चे शिकार

खासदाराचा रेट ८५ कोटी रुपये असल्याच्या चर्चा आहेत. एवढा पैसा येतो कुठून? हे जनतेसमोर आले पाहिजे. देशात असेच सुरू राहिले तर जनता एक दिवस रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, या संपूर्ण घडामोडींमुळे महाराष्ट्रातील राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून ठाकरे गटाच्या उद्याच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अल्पवयीन मुलीचा खून करून मृतदेह जंगलात जाळला

काळकाई चौक परिसरात राहत होते. १५ जून रोजी दुपारी दोघांमध्ये चारित्र्याच्या संशयावरून जोरदार वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की, संतापाच्या भरात शुभमने त्या अल्पवयीन मुलीला बेदम मारहाण करत तिच्या डोक्यात फरशी मारली.गंभीर जखमी झालेल्या प्रितीचा जागीच मृत्यू झाला. मात्र ही बाब मुलीच्या नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर ते पोलिसात जातील, म्हणून आरोपीने मुलीने विष घेऊन आत्महत्या केली असल्याचे सांगत दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत घटनेचा छडा लावला आणि खून तसेच पुरावा नष्ट केल्याचा प्रकार समोर आला. त्यानंतर याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात मुख्य आरोपी शुभम सुखदेव ओव्हाळ, त्याचे वडील सुखदेव ओव्हाळ आणि आईविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०३ सह इतर संबंधित कलमे, पॉक्सो कायदा आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्य आरोपीला ताब्यात घेतले असून इतर आरोपी ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत करत आहेत. खूनानंतर पुरावा नष्ट करण्याचा कट?घटना घडल्यानंतर आरोपीने ही बाब आपल्या आई-वडिलांना सांगितली. त्यानंतर तिघांनी मिळून गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी मृतदेह चादरीत गुंडाळून वाहनातून वडाळी रोड लगतच्या जंगलात नेण्यात आला. तेथे लाकडे रचून मृतदेहावर पेट्रोल ओतण्यात आले आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तो जाळण्यात प्रयत्न करण्यात आला.श्रीगोंद्यात संतापाची लाटअल्पवयीन मुलीच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी पसरताच श्रीगोंदा शहरासह परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. प्रेमसंबंधातील वादाचे रूपांतर इतक्या क्रूर गुन्ह्यात झाल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे मृत मुलगी अल्पवयीन असल्याने या प्रकरणात पॉक्सो कायद्याचीही कलमे लावण्यात आली आहेत.सुतावरून गाठला स्वर्गमयत अल्पवयीन मुलीला जंगलात पेट्रोल ओतून जाळताना आरोपीने त्याच्या नगरमधील एका मित्राला व्हिडिओ कॉल केला होता. मात्र तो मित्र घाबरला आणि सकाळी सकाळी अहिल्यानगर मधील पोलीस ठाण्यात स्वतःहून हजर होत माहिती दिली. त्यावरून आरोपींचा खरा चेहरा पोलिसांसमोर आला.तत्कालीन पोलीस निरीक्षकांनाही सह आरोपी करा...नुकतेच बदली झालेले पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्याकडे मयत मुलीची आई एप्रिल मध्ये अपहरण करून मारहाण केल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आल्या होत्या.

## होर्मुझ खुली होणार, नाकेबंदी हटणार...

सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करतील तसेच एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाहीत. इराण आणि अमेरिका ६० दिवसांच्या आत अंतिम करारासाठी काम करण्यास सहमत आहेत. दोन्ही देशांच्या संमतीने हा कालावधी वाढवला जाऊ शकतो. करार स्वाक्षरी झाल्यानंतर अमेरिका होर्मुझ सामुद्रधुनीतील नाकेबंदी तातडीने उठवेल आणि इराणच्या मार्गात अडथळा आणणार नाही. तसेच, अंतिम करारानंतर ३० दिवसांच्या आत अमेरिका आजूबाजूच्या परिसरातून आपले सैन्य माघारी घेईल.पर्शियन आखात आणि ओमानच्या समुद्रातून व्यापारी जहाजांची वाहतूक ३० दिवसांत पूर्ववत करण्यासाठी इराण पावले उचलणार. अमेरिका इराणला ३०० अब्ज डॉलर्सची आर्थिक मदत देणार आहे. अंतिम कराराचा भाग म्हणून अमेरिका इराणवरील निर्बंध टप्प्याटप्प्याने उठवेल. यामध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थांचा समावेश आहे. इराण अण्वस्त्र विकसित करणार नाही. युरेनियम आणि इतर अणु-संबंधित मुद्द्यांवर अंतिम करारात निर्णय घेतला जाईल, यावर दोन्ही बाजू सहमत आहेत.अंतिम करार होईपर्यंत दोन्ही बाजू सध्याची स्थिती कायम ठेवतील. इराण आपल्या अणु कार्यक्रमात कोणताही बदल करणार नाही आणि अमेरिका नवीन निर्बंध लादणार नाही. दरम्यान, या कराराबाबत दोन्ही देशांनी गोपनीयता बाळगली असल्याने शुक्रवारी स्वित्झर्लंडमध्ये स्वाक्षरी होणाऱ्या अंतिम कराराशी हा मसुदा किती सुसंगत असेल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## फिल्मी स्टाईल फसवणूक; बनावट बँक शिक्क्याने सव्वा चार लाखांचा अपहार

मात्र पैसे बँकेत जमा करण्याच्या कारणास्तव तो दुकानात येत होता. ५ मार्च २०२६ नंतर तो दुकानात आलेला नसून त्याच्याशी कोणताही संपर्क होत नसल्याने तो फसवणूक करून फरार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आरोपीकडे दुकानाचा रेडमी कंपनीचा सुमारे २२ हजार ९९९ रुपये किमतीचा मोबाईल फोनदेखील असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घ्यावा, अपहाराची रक्कम व मोबाईल परत मिळवून द्यावा, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

# श्रीरामपूरात तीन वर्षातच दुप्पट कचरा

## घनकचरा व्यवस्थापनावरून नगर परिषदेची सभा गाजली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** श्रीरामपूर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नव्या निविदेवरून जोरदार चर्चा रंगली. शहरातील कचरा उचलण्याचा ठेका मासिक ५४ लाख ४० हजार ६३० रुपयांनी देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देताना, गेल्या तीन वर्षांत शहरातील दैनंदिन कचऱ्याचे प्रमाण तब्बल दुप्पट झाल्याची बाब समोर आली. पूर्वी दररोज २१ टन कचरा संकलित होत असताना आता हे प्रमाण ४४ टनांवर पोहोचल्याचे प्रशासनाने सभागृहाला सांगितले.




नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत कचरा व्यवस्थापन हा प्रमुख चर्चेचा विषय ठरला. विद्यमान ठेकेदाराबाबत नागरिक व नगरसेवकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने नवीन ठेकेदार नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी २५ घंटागाड्या आणि ९ ट्रॅक्टर कार्यरत केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, आशिष धनवटे आणि भाजप गटनेत्या वैशाली चव्हाण यांनी निविदा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले. शहरातील अनेक भागांत आठ-आठ दिवस कचरा गाडी पोहोचत नसताना दररोज ४४ टन कचरा गोळा होतो कसा, असा सवाल त्यांनी केला. तसेच न्यायालयीन स्थगिती असलेल्या ठेकेदाराला ठेका दिला जात असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला.

दरम्यान, कचरा डेपोमधील प्रदूषण, स्वच्छतेचा अभाव आणि यंत्रसामग्री वापरात नसल्याबाबतही नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. कचरा व्यवस्थापनात सुधारणा करून नागरिकांच्या तक्रारी कमी करण्यासाठी नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येत असल्याचे नगराध्यक्ष ससाणे यांनी स्पष्ट केले.

सभेत पाणीटंचाईच्या संभाव्य संकटावरही चर्चा झाली. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी विशेष आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष ससाणे यांनी दिली. जुन्या बोअरवेल पुन्हा सुरू करून पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रयाशिवाय नवीन अग्निशमन वाहन खरेदी, स्टडी सेंटर उभारणी, नेहरू भाजी मंडई विकास, विविध विकासकामांना प्रशासकीय मंजुरी आदी विषयांनाही सभेत मान्यता देण्यात आली.

# एमआयडीसी नाम फलकाची अज्ञात व्यक्तीकडून तोडफोड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर-शिऊर महामार्गालगत असलेल्या आघूर-लोणी शिवारातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) नामफलकाची अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मंगळवारी वैजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राजू गिरजा मगरे ( तांत्रिक सहायक श्रेणी-२, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (स्थापत्य) विभाग, छत्रपती संभाजीनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १५ जून रोजी त्यांच्या निदर्शनास आले की, वैजापूर ते शिऊर जाणाऱ्या महामार्गालगत आघूर -लोणी शिवारात उभारण्यात आलेले एमआयडीसीचे लोखंडी नामफलक अज्ञात व्यक्तींनी सिमेंट कॉँक्रीटच्या चौथऱ्यावरून उखडून टाकले. तसेच फलकाची तोडफोड करून तो खाली पाडण्यात आला. या प्रकारामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सुमारे २५ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित अज्ञात व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून, वैजापूर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.



# शिवरस्ता मोकळा करण्यासाठी ग्रामस्थांचे उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील कापूसवाडगाव शिवारातील शिव रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करण्यात यावा या मागणीसाठी कापूसवाडगाव येथे ग्रामस्थांचे उपोषण सुरू आहे. उपोषणकर्त्यांशी प्रशासनाने चर्चा केली मात्र कुठलाही तोडगा निघाला नाही. दरम्यान बुधवार तारीख १७ जुलै रोजी उपोषणकर्त्यांनी वैजापूर तहसील कार्यालय गाठले व तहसील कार्यालयाच्या समोरच थाळी वाजून आंदोलन केले. रस्त्याच्या प्रकरणावरून काल तहसील कार्यालयात तहसीलदारांच्या दालनातच राडा बघायला मिळाला होता. दरम्यान त्या राड्याला २४ तास उलटत नाही तोच पुन्हा एकदा रस्त्याच्या मागणीसाठीच शेतकऱ्यांकडून थाळी वाजवून आंदोलन करण्यात आले.यामुळे खरंच महसूल प्रशासन रस्त्यांच्या प्रकरणात दुर्लक्ष करते का असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे? रस्त्यांची प्रकरणे तहसील कार्यालयात दाखल केली तर अनेक वर्षे उलटूनही न्याय मिळत नाही याची अनेक उदाहरणे समोर आहे. उशिरा मिळालेल्या न्याय हा एक प्रकारे अन्यायच असतो यामुळे वेळेवर न्याय मिळावा अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून होत असून महसूल प्रशासनावर शेतकऱ्यांना भरोसाच राहिलेला नाहीये.यामुळे गेल्या काही दिवसांत रस्त्याच्या प्रकरणात आंदोलने उपोषणे वाढली आहे.




# कनगर जि.प केंद्र शाळेत विध्यार्थ्यांचा प्रवेश उत्सव सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** कनगर ता. राहुरी येथे केंद्र शाळेत पहिलीच्या विध्यर्थ्यांचा प्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात साजरा आला.

कनगर येथील जि. प शाळेत पहिल्याच दिवशी २५ विध्यार्थी मुला मुलींनी प्रवेश घेऊन आपली उपस्थिती दर्शविली त्यांचा कागदी टोप्या, गुलाबाचे फुले देऊन व गोड जेवण देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी १ ली ते चौथी च्या विध्यार्थ्यांना शालेय पुस्तके व

यावर्षी पासून जि. प कनगर या शाळेत पाहिलीपासून सी बी एस सी पॅटर्न ची सुरुवात करण्याची परवानगी मिळाली आहे तसेच इयत्ता ५ वीच्या वर्गाची परवानगी मिळाली असून त्याबद्दल उपस्थित पालकांनी समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री अहिल्यानगर चे पालकमंत्री मा ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने सर्व विध्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले

कपड्यांचे वितरण करण्यात आले

यावेळी बोलताना सरपंच सर्जेराव घाडगे यांनी पहिलीच्या विध्यार्थ्यांचे स्वागत करून शाळेने राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. तसेच उपस्थित ग्रामस्थ व पालकांनी विद्यार्थ्यांचे अवलोकन हि केले यावेळी उपसरपंच बाळासाहेब गाढे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आप्पासाहेब नालकर, भाऊसाहेब घाडगे सुभाष नालकर, गोविंदराव दिवे, भाऊसाहेब दिवे, महमदभाई इनामदार, अन्सार शेख, धुरा जाधव, छायाताई दुशिंग उषाताई दिवे, केंद्र प्रमुख भागवत मॅडम,मुख्याध्यापक गोफने सर बांडे मॅडम शेख मॅडम ई सह पालक बंधू भगिनी उपस्थित होते

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME KHAN NAZIA BEGUM SATTAR ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS NAZIYA ASHIFKHAN PATHAN (AADHAR NO. 5285 7978 1613) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC

NEVASA PLACE: NEVASA

DATE : 17/06/2026

# लेफ्टनंट जनरल विजय ओबेराय यांचे निधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव :** नऊ वर्ष सर्वात जास्त काळ मराठा रेजिमेंटचे कर्नल ऑफ द रेजिमेंट ग्रुप कमांडर राहिलेले लेफ्टनंट जनरल विजय ओबेरॉय यांचे नुकतेच निधन झाले. जनरल ओबेरॉय १९६० पासून २००१ पर्यंत भारतीय सेनेत ४२ वर्षे सेवा केलेले अधिकारी आहेत. जनरल ओबेरॉय गोवा मुक्ती संग्राम, भारत पाकिस्तान १९६५, भारत पाकिस्तान युद्ध १९७१, मलेशियामध्ये मिलिटरी, अॅडव्हायझर, अमेरिकेमध्ये और कॉलेज लेक्चरर, ३५० इन्फंट्री ब्रिगेडचे कमांडर हिसार, मेकॅनिक डिव्हिजनचे कमांडर हिसार, मथुरा फर्स्ट कोर कमांडर, मथुरा ट्रेनिंग कमांडचे आर्मी कमांडर, सिमला वेस्टन कमांडचे आर्मी कमांडर, चंदिगड आणि व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ दिल्ली या महत्त्वपूर्ण पदावर त्यांनी काम केले. १९६५ च्या लढाईमध्ये त्यांना गोळी लागल्याने त्यांचा एक पाय कट करावा लागला. एका पायावर बी पी टी धावणारे ते भारतीय सेनेतील पहिले अधिकारी होते. आज चीप ऑफ डिफेन्स स्टाफ या पदाची निर्मिती करण्यामागे ओबेराय यांची संकल्पना होती.

# निधन वार्ता

## सुशीला गवारे



**शिरसगाव :** येथील सुशीला शांताराम गवारे (वय ५५) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पती,मुलगा नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रगत शेतकरी शांताराम गवारे यांच्या पत्नी व मधुकर गवारे यांच्या मातोश्री होत.

## लक्ष्मीबाई निर्मळ



**श्रीरामपूर :** राहता तालुक्यातील निर्मळ पिंपरी येथील लक्ष्मीबाई अण्णासाहेब निर्मळ (वय ५५ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, दिर, भावजाई असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी अण्णासाहेब निर्मळ यांच्या त्या पत्नी तर अभय, महेश व अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश निर्मळ यांच्या त्या मातोश्री होत.

## मंगल तांबे



**चांदा :** भेर्डापूर येथील मंगल शंकर तांबे यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी नुकतेच निधन झाले.

त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात बेर्डापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली सुना नातवंडे असा परिवार आहे.

# एसटीच्या फेऱ्या पूर्ववत न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर आगाराच्या गाजगाव मार्गावरील एसटी बसच्या फेऱ्या पूर्ववत सुरू न केल्यास २२ जूनपासून गंगापूर आगार कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा ग्रामसंवाद सरपंच संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष गुलाब शहा यांनी दिला आहे.

याबाबत छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागीय नियंत्रकांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गंगापूर आगारातून छत्रपती संभाजीनगर-गाजगाव-लासूर स्टेशन तसेच लासूर स्टेशन-गाजगाव-छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील बसफेऱ्या कमी करण्यात आल्या असून एक बससेवाही बंद करण्यात आली आहे. तसेच गाजगाव मार्गे गवळी शिवरा मुक्कामी जाणाऱ्या गाड्यांच्या फेऱ्या आणि ताडपिंपळगाव-लासूर-गाजगाव मार्गावरील सकाळी ८.३० वाजताची बस तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मार्गावरील बसफेऱ्या कमी झाल्यामुळे विद्यार्थी, एमआयडीसीतील कामगार, रुग्णालयात जाणारे नागरिक तसेच विविध गावांतील प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. गाजगाव, खादगाव, शाहापूर, पळसगाव, देर्डा, गोळेगाव, फुलशेवरा, गवळी शिवरा, गवळी धानोरा, सुलतानाबाद, बोरगाव आणि डोमेगाव परिसरातील नागरिकांना याचा फटका बसत आहे.

मागण्या मान्य न झाल्यास २२ जूनपासून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा गुलाब शहा यांनी दिला आहे.



# प्रवरा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा

## सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**झरेकाठी :** प्रवरा नदीपात्रातून शासनाची कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या वाळू उपसा करून पर्यावरणाची हानी केल्याप्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे व पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात असून पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाथरे बुद्रुक (ता.राहाता) येथील प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या परिसरात पोलिसांनी छापा टाकून अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले.याप्रकरणी पोलीस हवालदार रविंद्र मेढे यांनी फिर्याद दिली असून, मिनीनाथ संजय घोलप, संकेत संतोष शिरसाठ, राहुल दत्तात्रय दिघे, जयेश शिवप्रसाद पांडे, सार्थक दत्तात्रय हुलवन, विशाल संजय पिंपळे व प्रशांत सुनील घोलप यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या कारवाईत दरम्यान, पोलिसांनी अवैध वाळू उपशासाठी वापरण्यात येणारी सुमारे २० लाख रुपये किमतीची जेसीबी, १५ लाख रुपये किमतीचा डंपर, ५ लाख ५० हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर तसेच अंदाजे १६ हजार रुपये किमतीची दोन ब्रास वाळू असा एकूण ४० लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींनी संगनमत करून कोणतीही शासकीय परवानगी न घेता प्रवरा नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुमक्का एम सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी विभाग अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि . १८ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५९<br>३५७<br>५०० | ५-७ | १२४<br>१७९<br>११५ | जोड<br>५१-६७-६०-८४-७३ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १५०<br>२४०<br>३३० | ६-१ | १४६<br>२५०<br>२२७ | जोड<br>६३-७१-८०-२४-१५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २७०<br>२८९<br>२२५ | ९-५ | १४०<br>२३०<br>७८० | जोड<br>९०-४५-१३-२६-५७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 1 | | | | |

द • ख • ल

## विद्यार्थ्यांचे वाजतगाजत फुलांच्या वर्षावात स्वागत




**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त नवागत विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात वाजतगाजत फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत पुस्तक वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जितेंद्र भिंगारदिवे, दत्तात्रय पवार, बाबाजी तरटे, संदीप रोहोकले यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यालयाचे दत्तात्रय पवार, सरपंच लिलाबाई रोहोकले, अशोक रोहोकले, संदीप कपाळे, प्रा. बाबासाहेब नाईकवाडी, शिवाजी कदम, संतोष तडके, संदीप भागवत, कुंडलिक नाबगे, बुढणभाई शेख, आबासाहेब रोहोकले, प्रकाश लकडे, संतोष साबळे तसेच पुरुष व महिला पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## अहिल्यानगर महापालिकेत महाराणा प्रताप सिंह जयंती साजरी



**भाळवणी :** शौर्य, स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि अदम्य पराक्रमाचे प्रतीक असलेल्या महान योद्धा महाराणा प्रताप सिंह यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि राष्ट्रासाठी केलेल्या त्यागाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर म्हणाले की, महाराणा प्रताप यांचे जीवन हे संघर्ष, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी आयुष्यभर स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी संघर्ष केला. कितीही संकटे आली तरी त्यांनी आपल्या तत्त्वांशी आणि स्वातंत्र्याशी कधीही तडजोड केली नाही. त्यांचा पराक्रम, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचा इतिहास संपूर्ण देशाला प्रेरणा देणारा आहे. ते पुढे म्हणाले की, महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते प्रजेच्या हिताचा विचार करणारे न्यायप्रिय आणि कर्तव्यदक्ष राजे होते. आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांनी आपल्या प्रजेची साथ सोडली नाही.

## महिलेचा विनयभंग; सुनील बजाजविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील नवले नगर, गुलमोहर रोड परिसरात एका महिलेला अश्लील शिवीगाळ करत तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी सुनील बजाज याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि आरोपी सुनील बजाज यांच्यात पैशांच्या व्यवहारावरून बोलणे सुरू होते. पीडित महिलेने आरोपीला सोन्याच्या दागिन्यांच्या विक्रीबाबत व पैशांच्या हिशोबाबाबत विचारणा केली. याचा राग मनात धरून सुनील बजाज याने पीडित महिलेला भररस्त्यात गाठले. त्याने महिलेला अत्यंत हीन दर्जाचे शब्द वापरून तिची बदनामी करण्याची धमकी दिली. लोकांसमोर तिच्याकडे पाहून अश्लील हावभाव केले. तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला आणि तिच्या कुटुंबाला शिवीगाळ करून 'तुम्हाला पाहून घेतो', अशी धमकी दिली. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सुनील बजाज याच्याविरुद्ध विनयभंगाच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अधिकारी कल्पना चव्हाण करत आहेत.

## आगरकर मळा, आनंदनगर, सागर कॉम्प्लेक्स काटवण खंडोबा परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत



**अहिल्यानगर :** शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील आगरकर मळा, आनंदनगर, सागर कॉम्प्लेक्स तसेच काटवण खंडोबा रोड परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा गंभीरपणे विस्कळीत झाला असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभाग प्रमुख परिमल निकम यांना निवेदन देऊन परिसरातील समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. यावेळी अमोल गाडे, सुनील काळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, विजय गव्हाळे उपस्थित होते. निवेदनाद्वारे पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली असून, पुढील सात दिवसांत प्रश्न न सुटल्यास नागरिकांच्या वतीने महापालिका कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनचा इशारा देण्यात आला आहे.

## लायन्स युवा सांस्कृतिकमध्ये चार लिओ सदस्यांची निवड



**अहिल्यानगर :** लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लायन्स युवा सांस्कृतिक देवाणघेवाण लायन्स युथ एक्सचेंज प्रोग्राम उपक्रमाला यंदा विशेष यश मिळाले असून, प्रथमच शहरातील चार लिओ सदस्यांना विविध युरोपीय देशांतील आंतरराष्ट्रीय युवा देवाणघेवाण शिबिरांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लायन डॉ. संजय असनानी, लिओ क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लिओ गुरनूरसिंग वधवा तसेच युवा देवाणघेवाण कार्यक्रमाचे अध्यक्ष लायन हरजीतसिंग वाधवा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत जिनेश सुनील छाजेड यांची नॉर्वे, कु. आरजाकौर वधवा यांची स्पेन, तर ओम किरण भंडारी आणि सई ज्ञानेश्वर काळे यांची जर्मनी येथे निवड झाली आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे अहिल्यानगरच्या युवकांना जागतिक स्तरावर मैत्री, नेतृत्व आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचे नवे क्षितिज खुले झाले आहे.

### एक विद्यार्थी – एक वृक्ष संकल्पना

# हिरवेगार अहिल्यानगर घडविण्याचा निर्धार : उपमहापौर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ उभी करत शहराला हरित भविष्य देण्याच्या उद्देशाने उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत वृक्ष : आदर्श व्यक्ती हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथील विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी देशी वृक्षांच्या रोपांनी अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी प्रतीकात्मक स्वरूपात १०० विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची रोपे भेट देण्यात आली. स्वागताची ही आगळीवेगळी आणि पर्यावरणपूरक भेट मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि समाधानाचे भाव स्पष्टपणे दिसून येत होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तकांसोबत वृक्षसंवर्धनाचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपमहापौर ड. धनंजय जाधव म्हणाले की, नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत शहरभर मोठ्या



प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य सुरू आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वाढत्या तापमानाला आळा घालण्यासाठी वृक्ष लागवड हा एकमेव प्रभावी पर्याय आहे. त्यामुळे या मोहिमेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची रोपे देण्यात येणार आहेत.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ही रोपे केवळ घरी नेऊन ठेवू नयेत, तर आपल्या घराच्या परिसरात, मोकळ्या जागेत किंवा उपलब्ध ठिकाणी लावून त्यांचे जतन आणि संवर्धन करावे. ज्या प्रकारे आपण आपल्या आदर्श व्यक्तीचा सन्मान करतो, त्याचप्रमाणे वृक्षालाही आदर्श मानून त्याची काळजी घ्यावी. वृक्ष आपल्याला सावली, प्राणवायू, फळे, पर्यावरणीय संतुलन आणि जीवन देतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

वाढत्या तापमानाबाबत चिंता व्यक्त करताना ड. जाधव म्हणाले की, दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानाच्या संकटापासून मानवजातीचे संरक्षण करण्याची क्षमता केवळ वृक्षांमध्येच आहे. सिमेंटच्या जंगलांमध्ये हरित क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल.

## बारावी परीक्षेच्या शुल्काचा अपहार प्रगत विद्यालयाच्या लिपिकाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरच्या गांधी मैदान परिसरातील प्रगत विद्यालयात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बारावी बोर्डाच्या परीक्षेची फी भरण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक आणि शैक्षणिक फसवणूक केल्याप्रकारणी विद्यालयाचा लिपिक लुहाण लक्ष्मण पहिलाजरॉय याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराने नगर शहरासह जिल्ह्यात विद्यार्थी व पालक वर्गात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, नगरच्या सर्जेपुरा येथील किराणा व्यावसायिक अमोल टिल्लु गायकवाड यांच्या मुलगा व इतर चार विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करून प्रगत महाविद्यालयाचा लिपिक लहान लक्ष्मण पहिलाजरॉय याने त्यांच्याकडून बारावी बोर्ड एटीकेटी परीक्षेचे शुल्क रोख स्वरूपात गोळा केले




होते. मात्र, सदर रक्कम ऑनलाइन पद्धतीने बोर्डाकडे जमा न करता, एकूण ३ हजार १५० रुपयांचा अपहार केला.

यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून त्यांची फसवणूक झाली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गायकवाड यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी लुहाण पहिलाजरॉय विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. महाविद्यालयाच्या लिपिकानेच विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आल्याच्या घटनेने शहरातील विद्यार्थ्यांमध्ये शंका कुशंका व्यक्त केल्या जात आहे.

## पुणे–शिर्डी थेट रेल्वे सेवेला हिरवा कंदील

### खा. लंके यांच्या पाठपुराव्याला यश : लाखो प्रवाशांची दीर्घकालीन मागणी पूर्ण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पुणे–शिर्डी थेट रेल्वे सेवेचा आज शुभारंभ होताच पुणे, अहिल्यानगर, कोपरगाव आणि शिर्डी परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम मिळाला आहे. राज्यातील दोन महत्त्वाच्या केंद्रांना जोडणारी ही रेल्वे सेवा सुरू झाल्याने प्रवाशांच्या प्रवासाचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून या सेवेमुळे धार्मिक पर्यटनासह शिक्षण, आरोग्य आणि व्यापार क्षेत्रालाही मोठी चालना मिळणार आहे. अहिल्यानगर स्थानकावर खा. लंके यांच्या पत्नी राणी लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून गाडीचे प्रस्थान करण्यात आले.

या रेल्वे सेवेच्या मंजुरीसाठी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी खा. नीलेश लंके यांनी रेल्वे मंत्रालय, वरिष्ठ रेल्वे अधिकारी तसेच लोकसभेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरांवर केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर ही सेवा प्रत्यक्षात सुरू




झाल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुणे हे राज्यातील प्रमुख शैक्षणिक, औद्योगिक आणि आरोग्य केंद्र मानले जाते. दुसरीकडे शिर्डी हे देश–विदेशातील लाखो साईभक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, शेतकरी आणि भाविक प्रवास करतात. थेट रेल्वे सेवा उपलब्ध झाल्याने या सर्व घटकांना अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

या रेल्वे सेवेचा लाभ केवळ प्रवासी वाहतुकीपुरता मर्यादित राहणार नसून कृषी व व्यापारी क्षेत्रालाही त्याचा मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांच्या बाजारपेठांशी अधिक प्रभावी संपर्क साधता येणार असून व्यापारवृद्धीलाही चालना मिळेल. तसेच उपचारासाठी पुण्यात जाणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना या सेवेचा विशेष लाभ होणार आहे.

खा. नीलेश लंके यांनी लोकसभेत अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्न सातत्याने मांडले आहेत. पुणे–शिर्डी थेट रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी त्यांनी रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन अनेकदा पाठपुरावा केला होता. आज त्या प्रयत्नांना यश मिळाल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

काही पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे खा. लंके यांना शुभारंभ सोहळ्यास प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या पत्नी राणी लंके यांनी हिरवा झेंडा दाखवून गाडीचे शिर्डीकडे प्रस्थान झाले. खा. लंके यांनी त्यांनी शुभेच्छा देताना विकासाभिमुख कामांसाठी आपला संघर्ष आणि पाठपुरावा यापुढेही कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

जनतेच्या मागण्यांना न्याय मिळवून देणे हेच माझे कर्तव्य आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या रेल्वे, रस्ते, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्नासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे, असे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

## विद्यार्थिनी वस्तीगृह उभारण्यासाठी जागेची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी शहरात येताना निवासाच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यासाठी सुरक्षित, सुसज्ज आणि अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागा देण्याची मागणी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आ. संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नगर शहरालगत १० ते १५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार यांची उपस्थिती होती. तसेच माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, संचालिका वैशाली दारकुंडे, प्रा. सुधाकर सुंबे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे हजारो शिक्षक सभासद राज्यभर कार्यरत आहेत. त्यांच्या मुला–मुलींना उच्च शिक्षणासाठी अहिल्यानगर शहरात येणे आवश्यक ठरते. मात्र अनेक शिक्षक कुटुंबांकडे शहरात स्वतःची राहण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थिनींना सुरक्षित निवासाचा प्रश्न भेडसावत असतो. खासगी वसतिगृहे आणि भाड्याच्या घरांचा वाढता खर्चही पालकांसाठी आर्थिक भार ठरत आहे. शिवाय सुरक्षिततेची हमी नसते.

विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरणात राहण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी माध्यमिक शिक्षक सोसायटीने स्वतंत्र वस्तीगृह उभारण्याचा संकल्प केला आहे. या वस्तीगृहामध्ये आधुनिक सुविधा, सुरक्षित निवास, अभ्यासिका, ग्रंथालय तसेच विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा वस्तीगृहांची आवश्यकता असून, हा प्रकल्प सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

## राजमाता जिजाऊ स्मृतिदिनी ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहमदनगर :** राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी देण्याचा अनोखा सामाजिक उपक्रम फिनिक्स सोशल फौंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आला. नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराच्या माध्यमातून ४८ ज्येष्ठ नागरिकांवर पुणे येथे यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर नवदृष्टी मिळालेले ज्येष्ठ नागरिक राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनी अहिल्यानगरात परतले आणि त्यांनी जिजाऊंना अभिवादन करत त्यांच्या कार्याचा जयघोष केला.

यावेळी शस्त्रक्रियेनंतर प्रथमच स्पष्टपणे पाहण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत



होता. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत फिनिक्स फौंडेशनने त्यांच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणल्याची भावना व्यक्त केली. याबाबत बोलताना फिनिक्स सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी सांगितले की, आर्थिक दुर्बल घटकांतील अनेक नागरिक केवळ आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहतात. विशेषतः मोतीबिंदूसारख्या आजारामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांचे दैनंदिन जीवन कठीण होते. अशा गरजू नागरिकांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्यासाठी फिनिक्स फौंडेशनने जिल्हाभर दृष्टीदानाची मोठी चळवळ उभी केली आहे. ते पुढे म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरणा दिली. रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी दिलेले संस्कार आणि समाजहिताचा विचार आजही प्रेरणादायी आहे. त्याच विचारांचा वारसा घेऊन फिनिक्स फौंडेशन समाजातील उपेक्षित आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवत आहे.

# गावातील रस्ते अतिक्रमणमुक्त करा..

### साकतकरांनी मांडली आ. विक्रमसिंह पाचपुतें समोर कैफियत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** साकत गावातून जाणाऱ्या सोलापूर महामार्गावरील वेशी पासून ते शिंदे वस्ती पर्यंत हा रस्ता गावात ये–जा करण्यासाठी प्रमुख रस्ता असून सद्य स्थितीत या रस्त्यावर जागोजागी अतिक्रमण झाले आहे. तसेच हा रस्ता पूर्ण खराब झालेला असून शिंदे वस्ती, चितळकर वस्ती, निमसे वस्ती तसेच गावातील शेतकऱ्यांना ये–जा करण्यासाठी पावसाळ्यात प्रचंड हाल होतात, त्यामुळे या रस्त्यावरील अतिक्रमण त्वरित हटवून रस्त्याचे काम करण्यात यावे अशी कैफियत साकतखुर्द (ता. नगर ) येथील ग्रामस्थांनी नगर –श्रीगोंदा मतदार संघांचे



आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या समोर मांडली.

''आमदार आपल्या गावी' यांतर्गत आ. विक्रमसिंह पाचपुते यांचा गावभेट दौरा नगर मतदार संघात सध्या मोठया जल्लोषात सुरु आहे. या दौऱ्यात तहसीलदार, गटविकास अधिकारी ,कृषीविभाग, आरोग्यविभाग, वनविभाग, सां. बा. विभाग, जलसिंचन विभाग, पोलीस डिपार्टमेंट, महावितरण आदींचा ताफा सोबत असून, मतदार संघातील प्रत्येक गावातील प्रत्येक समस्याचा निपटारा जागेवरच होत आहे. दरम्यान साकत येथे बुधवारी (दि. १७) सकाळी आ. पाचपुते यांनी गावभेट दिली. या सर्व मागण्याची आ. पाचपुते यांनी दखल घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्या. यामुळे गावातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी भाजपा युवा नेते दादासाहेब दरेकर, भाजपा जिल्हा चिटणीस महेश वाघ दत्तात्रय पा. चितळकर, सरपंच डॉ. नंदू पवार, उपसरपंच बाबासाहेब चितळकर, ग्रा. पं. सदस्य श्रीधर पवार, मोहन वाघमोडे, रामदास चितळकर, पोपट चितळकर, से. सो. अध्यक्ष अशोक शिंदे, सुभाष पवार, माणिक शिंदे, रावसाहेब चितळकर, संपत वाघमोडे, तात्या वाघमोडे, राजू वाघमोडे, पोपट पवार, रामदास दरेकर, ग्रामसेवक रेशमा कराळे, तलाठी घुमरे, यासह विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

**निवृत्तीनाथ पालखी सोहळ्याला अतिक्रमणाचा विळखा !**

संत श्रेष्ठ निवृत्तीनाथांचा पालखी सोहळा नगर मुक्कामा नंतर साकतखुर्द येथे मुक्कामी असतो. लाखों रुपयांची फुले वापरून सोहळ्यातील रथ सजवला जातो. परंतु गावातील मुख्य रस्त्यावर असलेल्या झाडामुळे अडचणी निर्माण होऊन रथाचे नुकसान होत आहे. महागडी फुले वापरून केलेला खर्च वायाला जातो. यामुळे निवृत्तीनाथ पालखी सोहळा प्रमुखांनी याआगोदर अनेकवेळा नाराजी व्यक्त केली आहे. सालाबाद प्रमाणे याही वर्षी पालखी सोहळा १३ जुलै रोजी साकत मुक्कामी येत आहे. त्या अनुषंगाने मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामस्थांनी आ. पाचपुते यांना निवेदन दिले आहे.

# द • ख • ल

## मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप साहेब यांची पुणे येथे बदली



**श्रीरामपूर :** नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची सह आयुक्त, गट अ,जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे या पदावर बदली झाली असून त्यांना आजच कार्यमुक्त करण्यात आले आहे. नगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुरू असतानाच हा बदली आदेश त्यांना प्राप्त झाला. आपल्या दीड वर्षाच्या कारकिर्दीत श्रीरामपूर शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत कठोर भूमिका घेतली.शहराच्या पाणीपुरवठा योजनेचे काम त्यांच्या काळात सुरू झाले. एक अभ्यासू व कर्तबगार अधिकारी म्हणून त्यांची ख्याती असून ही बदली त्यांनी करून घेतल्याची चर्चा शहरात आहे.

## न्हावरा येथे पिस्तुल घेऊन फिरणारा एकजण ताब्यात

**तळेगाव ढमढेरे :** न्हावरा (ता.शिरूर) येथे पिस्तुल घेऊन फिरणाऱ्या एका युवकाला शिरुर पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेऊन पिस्तुल व जिवंत काडतूसासह अटक केले असून विजय उर्फ कोयत्या गोविंद शेडगे असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपीचे नाव आहे. न्हावरा (ता. शिरुर) येथे तळेगाव ढमढेरे-न्हावरा रस्त्याजवळ असलेल्या मंडलाधिकारी कार्यालयाच्या परिसरात एक युवक गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे घेऊन फिरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना मिळाली, त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस अंमलदार निखील रावडे, अंबादास थोरे, नीरज पिसाळ, विजय शिंदे, निलेश थोरात, अजय पाटील, दादाराव नागरे यांनी सदर ठिकाणी जाऊन सापळा रचला असता त्यांना एक संशयित युवक मिळून आला, दरम्यान पोलिसांनी त्याला जागेवर पकडून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतूस मिळून आले, यावेळी पोलिसांनी त्याला ताब्यात घेत गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतूस जप्त केले, तर याबाबत पोलीस अंमलदार नितेश दत्तात्रय थोरात (रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी विजय उर्फ कोयत्या गोविंद शेडगे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण हे करत आहे.

## पिसर्वे येथे शाश्वत शेती विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**माळशिरस :** सध्याच्या सततच्या हवामान बदलांना उत्तर देण्यासाठी शाश्वत शेती ही संकल्पना गरजेची असून नैसर्गिक आदर्श शेतीचा प्रयोग राबवण्याच्या दृष्टीने पिसर्वे येथे शेतकऱ्यांना मान्यवरांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते..जीव भावना फाउंडेशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात निवृत्त न्यायमूर्ती अँड बी जी कोळसे पाटील, पाणी पंचायतच्या कल्पनाताई साळुंखे कृषी परिषदेचे माजी उपाध्यक्ष विजय कोलते आदींनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पिसर्वे येथे या उपक्रमांतर्गत एक एकर क्षेत्रावर हा प्रयोग राबवण्यात येतं असून पर्यावरणाबद्दल जागरूकता शेतीतील नैसर्गिक झाडें, फळझाडे, अंतरपीक, पाण्याचे नियोजन, जैवविविधता,अच्छादन आदी बाबींवर उपस्थित सर्वच मान्यवरांनी उत्तम मार्गदर्शन केले. माजी सरपंच शांताराम बापू कोलते, सुखदेव कोलते, फाउंडेशनच्या माधवी कोलते, माजी सरपंच संभाजी कोलते,सुनीता कोलते,बायडाबाईकोलते, युवा उद्योजक गौरव कोलते, सुखदेव कोलते, शशिकला कोलते,मंगल म्हस्के, सुभाष कोलते, दादा कटके महेश कोलते,विकास कोलते, सुनील कोलते यांसह अनेक शेतकरी या प्रसंगी उपस्थित होते



## वाघाळेत महिलेच्या विनयभंग प्रकरणी एकावर गुन्हा

**तळेगाव ढमढेरे :** वाघाळे (ता. शिरूर) येथे घराबाहेर काम करणाऱ्या महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे ओंकार दिलीप पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाघाळे (ता. शिरूर) येथील महिला घरासमोर झाडांना पाणी घालत असताना गावातील ओंकार पवार याने महिलेजवळ येत महिलेला अश्लील शिवीगाळ करून महिलेचा हात पकडून महिलेच्या मनाला लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले, दरम्यान ओंकार याने महिलेच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली, घडलेल्या प्रकाराबाबत पीडित महिलेने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी ओंकार दिलीप पवार (वय २६ वर्षे रा. वाघाळे ता. शिरुर जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार संदीप जगदाळे हे करत आहे.

# सोनगावातील अवैध हातभट्टी दारू अड्ड्यांवर पोलिसांची धडक कारवाई

### ६० हजारांचे रसायन जप्त, तिघांवर गुन्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती तालुका पोलीस ठाणे हद्दीतील अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत सुमारे ६० हजार रुपये किमतीचे ६०० लिटर रसायन जप्त केले असून तीन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५ जून रोजी दुपारी बारामती तालुका पोलिसांनी सोनगाव (ता. बारामती) येथे छापेमारी केली. यावेळी करिना अनिकेत भोसले हिच्या राहत्या घराच्या आडोशाला सुरू असलेल्या हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत सुमारे २० हजार रुपये किमतीचे २०० लिटर गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायन जप्त करण्यात



आले. याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यानंतर पोलिसांनी संजिवनी मजनू भोसले हिच्या घराशेजारी असलेल्या दारू अड्ड्यावर धाड टाकली. या कारवाईत सुमारे ४० हजार रुपये किमतीचे ४०० लिटर रसायन जप्त करण्यात आले. तिच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २८३/२०२६ नुसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दि. १४ जून रोजी सकाळी एमआयडीसी बारामती परिसरातील गोदरेज कंपनीच्या आडोशाला एक व्यक्ती देशी दारूची बेकायदेशीर विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून नागेश प्रकाश चंदनशिवे (रा. दुर्गा टॉकीजजवळ, बारामती) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ५६० रुपये किमतीच्या ९० मिली मापाच्या १४ सिलबंद देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड तसेच बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार, पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, सुरेंद्र वाघ, खारतोडे, एकसिंगे, राजश्री आटोळे, निलेश वाकळे, सौरभ तुपे तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकातील पोलीस अंमलदारांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात बारामती तालुका पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवसायांविरोधात पुढील काळातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## मांदळेवाडीचा वीजपुरवठा होणार सुरळीत २५ लाखांच्या उच्चदाब वीजवाहिनी कामाचे भूमिपूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव) येथील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून होत असलेल्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. सद्यस्थितीत मांदळेवाडी गावाला शिरूर तालुक्यातून वीजपुरवठा केला जात असल्याने संबंधित ठिकाणी होणाऱ्या लोडशेडिंगचा परिणाम गावावर होत होता.

विशेषतः दररोज सायंकाळी ६ ते १० या वेळेत वारंवार वीज खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले होते. मांदळेवाडी गावाचा वीजपुरवठा आंबेगाव तालुक्यातील लोणी उपकेंद्रातून करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती.

या मागणीसाठी माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील, पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता.

या प्रयत्नांना यश मिळाले असून वडगावपीर येथून मांदळेवाडीपर्यंत नवीन उच्चदाब वीजवाहिनी (एचटी लाईन) टाकण्याच्या कामास मंजुरी मिळाली आहे. सुमारे ५० पोल उभारून ही वीजवाहिनी उभारण्यात येणार असून या कामासाठी अंदाजे २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. महावितरणच्या मंचर विभागामार्फत हे काम हाती घेण्यात आले असून नुकतेच या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

सदर कार्यक्रम भूमिपूजन प्रसंगी पंचायत समिती सदस्या कु. अंकिता अनिल वाळुंज, संविदने गावचे माजी सरपंच वसंत पडवळ, मांदळेवाडी सरपंच उज्वला आदक, धामणी ग्रामपंचायत सदस्य प्रतीक जाधव पाटील, उद्योजक चेतन पडवळ, विजय आदक, बाळशिराम वाळुंज आदी ग्रामस्थ उपस्थित होते

## सणसवाडी येथील धोकादायक विहिरीला कठडे बसवण्याची गरज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** सोलापूर जिल्ह्यात तांदूळवाडी मध्ये रस्त्याचे कडेला विहिरीमध्ये एक वाहन उलटून काही नागरिकांचा जीव गेलेला असताना

> सणसवाडी येथील धोकादायक विहिरीबाबत ग्रामपंचायतच्या मासिक मिटिंग मध्ये चर्चा करुन निर्णय घेतला जाईल असे ग्रामपंचायत अधिकारी प्रकाश गळवे यांनी सांगितले.

अशा धोकादायक विहिरींचा प्रश्न ऐरणीवर आलेला असून सणसवाडी येथील अशा धोकादायक विहिरीला कठडे बसवण्याची मागणी ग्राहक पंचायतचे सामाजिक कार्यकर्ते अशोक दरेकर यांनी केली आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथील खंडोबा आळी लगत सणसवाडी गावातून तळेगाव ढमढेरे व कोरेगाव भीमा गावामध्ये जाणाऱ्या रस्त्याचे कडेलाच धोकादायक विहीर असून सदर ठिकाणी कोणताही दिशादर्शक अथवा धोका दाखवणारा फलक नसून सदर ठिकाणी ग्रामपंचायतच्या माध्यमातून रस्ता काँक्रीटकरण करण्यात आलेला आहे, मात्र येथे रस्त्याचे कडेला अथवा विहिरीला संरक्षण कठडे नसल्याने भविष्यात येथून येणाऱ्या जाणाऱ्या स्कूल बस, कंपन्यांची वाहने, ट्रॅक्टर, ट्रक यांसह आदी वाहनांना धोका निर्माण होण्याची शक्यता सामाजिक कार्यकर्ते अशोक दरेकर यांनी वर्तवली असून सोलापूर जिल्ह्यातील तांदुळवाडी गावासारखी घटना घडू नये म्हणून प्रशासनाने याकडे लक्ष देऊन तातडीने रस्त्याला तसेच विहिरीला कठडे बसवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अशोक दरेकर यांनी केली आहे.



सणसवाडी (ता. शिरुर) येथील रस्त्याच्या कडेला असलेली धोकादायक विहीर.(छायाचित्र आकाश भोरडे)

# बोगस बियाणे-खत विक्रेत्यांवर कारवाईचे निर्देश

### खरीप हंगाम व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तालुकानिहाय आढावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** खरीप हंगाम २०२६ची तयारी तसेच संभाव्य पाणीटंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (दि. १६) हवेली, पुरंदर, दौंड, बारामती, इंदापूर आणि शिरूर तालुक्यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा बैठक पार पडली. पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, कृषी विकास अधिकारी अजित पिसाळ, सभापती कृषी व पशुसंवर्धन समिती अमोल नलावडे, सभापती बांधकाम व आरोग्य समिती दिपाली फुलावडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी विष्णू गरजे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री. ढेरे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी



उपस्थित होते.

बैठकीत कृषी निविष्ठांची उपलब्धता, पाणीटंचाई निवारण उपाययोजना, विविध योजनांची अंमलबजावणी आणि आगामी नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. खत, बियाणे आणि युरियाच्या संभाव्य तुटवड्याबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित तालुक्यांनी वस्तुस्थितीची माहिती संकलित करून जिल्हा परिषदेकडे सविस्तर अहवाल सादर करावा, अशा सूचना देण्यात आल्या. बोगस बियाणे व खत विक्रीला आळा घालण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले. शेतकऱ्यांना खत वितरण करताना अनावश्यक लिंकिंग अथवा बांधील विक्री होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले.

पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार तात्काळ टँकर सुरू करावेत तसेच पाणीटंचाई निवारणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत, असे निर्देश बैठकीत देण्यात आले. गटविकास अधिकाऱ्यांनी नियमित दौरे करून प्रत्यक्ष पाहणी करावी आणि पावसास विलंब झाल्यास संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन सूक्ष्म नियोजन तयार करावे, असेही सांगण्यात आले. अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेती, पिण्याचे पाणी व जलस्रोत व्यवस्थापनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबरोबरच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष प्रसिद्धीपत्रके प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कार्यरत पाणीपुरवठा योजनांना तातडीने वीजजोडणी उपलब्ध करून देणे तसेच सौरऊर्जेवर चालविता येणाऱ्या योजनांचे प्रस्ताव त्वरित सादर करून अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. नुकतेच निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांच्या सूचना आणि मागण्या विकास आराखड्यांमध्ये समाविष्ट करून प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता यावेळी व्यक्त करण्यात आली. खरीप हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी कृषी, जलसंधारण आणि पाणीपुरवठा विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.ि

# शाळेचा पहिला दिवस...बारामती नगरपरिषदेच्या १७ शाळांमध्ये औक्षण, पुष्पवर्षाव आणि लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत..!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी बारामती नगरपरिषदेच्या सर्व १७ शाळांमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथकांचे सादरीकरण, विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पवर्षाव आणि विविध स्वागत उपक्रमांच्या माध्यमातून नवागत तसेच जुन्या विद्यार्थ्यांचे आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी आणि संस्मरणीय व्हावी, शाळेविषयी आत्मीयता वाढावी तसेच शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने नगरपरिषदेच्या शिक्षण विभागाने विशेष नियोजन केले होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, पेन्सिल, शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला. नगरपरिषदेच्या प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या हातांचे व पायांचे ठसे घेऊन स्मृतीफलक तयार करण्यात आले, तर काही ठिकाणी आकर्षक सजावट, स्वागत कमानी, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली. शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो. या क्षणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि लोकप्रतिनिधींनी विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवत त्यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत हास्यकल्लोळ, संवाद आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून नव्या शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करण्यात आली.

> स्वर्गीय अजितदादा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांच्या विकासदृष्टीतून शिक्षणाला प्राधान्य.बारामतीच्या विकासाचा पाया शिक्षणामध्ये आहे, ही विचारधारा स्वर्गीय अजितदादांनी रुजविली आणि आज राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच विकासदृष्टीने शैक्षणिक क्षेत्र अधिक सक्षम करण्याचे काम सुरू आहे. बारामतीच्या विकासाचा पाया शिक्षणामध्ये आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक सुविधा आणि आनंददायी शालेय वातावरण उपलब्ध करून देणे हे नगर परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रवेशोत्सवासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आत्मीयता निर्माण होते आणि शिक्षणाची गोडी वाढते. भविष्यातही नगरपरिषदेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.''
>
> **:- सचिन सातव : (नगराध्यक्ष बानप)**

> ''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली तर त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. प्रवेशोत्सव हा केवळ स्वागताचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या मनात शाळेविषयी जिव्हाळा आणि आत्मीयता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. आगामी काळातही शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.''
>
> **:- श्वेता नाळे : (उपनगराध्यक्षा तथा शिक्षण समिती सभापती )**



या प्रवेशोत्सव कार्यक्रमाला नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा तथा शिक्षण समिती सभापती श्वेता नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे, शिक्षण विभाग प्रमुख जुई पवार, माजी प्राचार्य मुरूमकर सर, नगरसेवक तथा प्रतोत विशाल हिंगणे, नगरसेवक सोमनाथ गजाकस, गणेश जोजारे, गोरख पारसे, अल्ताफ सय्यद, अमर धुमाळ, अविनाश निकाळजे, शर्मिला ढवाण, सविता जाधव, धनश्री बांदल, सारिका वाघमारे, पत्रकार सुरज देवकाते तसेच क्रीडा शिक्षक गावडे सर, पाटील सर, नवनाथ मलगुंडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसची धडक बसल्याने ट्रक उलटला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथे विरुद्ध दिशेला वळण घेत असलेल्या ट्रकला भरधाव वेगाने आलेल्या बसची धडक बसून ट्रक रस्त्यावर उलटल्याची घटना घडली असून सिदैवाने चालक व अन्य प्रवाशी बचावले आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावर शिक्रापूर बाजूने पुणेच्या दिशेने चाललेला एम एच १२ व्ही टी १७७७ हा ट्रक चाललेला असताना बजरंग वाडी येथे विरुद्ध दिशेला पुणे नगर रस्त्यावर ट्रक वळण घेत असताना समोरून आलेल्या एम एच १२ वाय बी ३००५ या पीएमटी बसची धडक ट्रकला बसून ट्रक रस्त्यावर उलटला, यावेळी पोलीस हवालदार संदीप बनकर, मिलिंद देवरे, ट्राफिक वार्डन किरण थोरात, पप्पू सासवडे यांनी वाहतूक कोंडी सुरळीत करत रस्त्यावर उलटलेला ट्रक क्रेनच्या सहाय्याने बाजूला घेतला, सुदैवाने यावेळी झालेल्या अपघातात कोणत्याही प्रकारची जिवीत हानी झाली नसून ट्रक व पीएमटी बसचे नुकसान झाले आहे.



शिक्रापूर (ता. शिरुर) येथे पुणे नगर महामार्गावर उलटलेला ट्रक. (छायाचित्र आकाश भोरडे)

द•ख•ल

## श्रीराम विद्यालयात नवागतांचे औक्षण



**ढोरजळगाव :** श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय, ढोरजळगाव येथे नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साह, आनंद आणि जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. रंगीबेरंगी फुग्यांचे वाटप करून विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले. त्यानंतर झांज, ढोल-ताशांच्या गजरात गावातून भव्य स्वागत मिरवणूक काढण्यात आली. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी ढोरजळगावशे.च्या सरपंच सुवर्णाताई गिऱ्हे तसेच ढोरजळगाव ने.च्या सरपंच अश्विनीताई कराड, विद्यालयाचे माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर फसले, विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे,पांडुरंग व्यवहारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका सुरेखा शेलार यांनी केले, सूत्रसंचालन रत्नमाला फलके यांनी तर आभार कल्याण राऊत यांनी मानले.

## भातकुडगांव विद्यालयात नवगतांचे स्वागत



**ढोरजळगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालय येथे आज दि १५ जुन रोजी इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव व नवागताचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता ५ वी ची ६० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक तसेच विद्यालयाचे प्राचार्य सुरेश शेरे शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी उपस्थित होते.

## जेऊरमध्ये वादळी वाऱ्याने सौर पॅनलचे नुकसान



**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर येथे सोमवार दि. १५ जून रोजी सायंकाळी जेऊर परिसरात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या सौर पॅनलचे मोठे नुकसान झाले आहे. वाऱ्याच्या तीव्र झोतामुळे सौर पॅनलच्या प्लेटा उखडून गेल्या तसेच प्लेटांची मोडतोड झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. जेऊर शिवारातील चापेवाडी परिसरातील राजू निवृत्ती पवार, खंडोबा माळ येथील विजय दगडू शिंदे तसेच गवारे वस्ती परिसरातील सोपान जनार्दन टापरे यांच्या शेतातील सौर पॅनलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहिती संबंधित शेतकऱ्यांनी दिली. वादळी वाऱ्यामुळे सौर पॅनलच्या उडून बाजूला जाऊन पडल्या. त्यामुळे प्लेटांची मोडतोड झाली असल्याची माहिती शेतकरी राजू पवार यांनी दिली. शेतकऱ्यांनी मोठी गुंतवणूक करून उभारण्यात आलेल्या सौर प्रकल्पांचे नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीने परिसरातील शेतकऱ्यांसमोर नवे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

### पाच वर्षांचा पाठपुरावा व्यर्थ

# बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात !

## इमामपूर ग्रामस्थांचा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील इमामपूर गावामध्ये एसटी बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. सलग पाच वर्ष एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे मागणी करून देखील त्याचा उपयोग झालेला नाही. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांच्या वतीने सरपंच बाजीराव आवारे यांनी सोमवार दि.२२ जून रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक यांना याबाबत निवेदन देण्यात आले आहे. इमामपूर ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांनी सलग पाच वर्षांपासून राज्य परिवहन विभागाकडे बस थांबण्यासाठी वारंवार पाठपुरावा केला. सन २०२१ पासून अनेक निवेदने दिली. पत्रव्यवहार केला, मात्र आजपर्यंत बसथांब्याचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. परिणामी शिक्षणासाठी दररोज प्रवास करणाऱ्या शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी नेमकी कोण घेणार ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

इमामपूर येथुन नेवासा-शेवगाव-पाथर्डी मार्गावर धावणाऱ्या बसला अधिकृत थांबा मिळावा यासाठी २०२१ पासून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. ग्रामपंचायतीने अनेक वेळा विभाग नियंत्रक, आगार प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने दिली. तरीही प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळाली प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

बसथांबा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना रस्त्यावर तासनतास उभे राहावे लागत आहे. अनेकदा बस न थांबल्याने विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालय गाठणे अशक्य होते. शासन 'शिक्षणाचा हक्क' आणि विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवत असताना प्रत्यक्षात बससारखी मूलभूत सुविधा मिळत नसल्याने ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

### जेऊरची तीच परिस्थिती !

जेऊर परिसरातून शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी अहिल्यानगरकडे प्रवास करत असतात. परंतु येथेही अनेक बस थांबत नाहीत. या ठिकाणी जलद गाड्यांनाही थांबा देण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु जेऊर थांब्यावरही विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. छत्रपती संभाजीनगर महामार्गावर एकाही ठिकाणी बस थांब्यासाठी शेड नाही. त्यामुळे नागरिकांचे देखील हाल होतात.




इमामपूर परिसरातून असंख्य विद्यार्थी शिक्षणासाठी जेऊर तसेच अहिल्यानगरला येत असतात. परंतु बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. यापूर्वी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चालक व वाहकांना बस थांबविण्याबाबत सूचना दिल्या होत्या. परंतु तरीदेखील बस थांबत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. इमामपूर येथील फरशी मळा तसेच बहिरोबा मळा या दोन्ही थांब्यावर विद्यार्थ्यांसाठी बस थांबविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा समस्त ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## सिद्धेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धार कामात सुधारणा करावी

### पुरातत्व विभागाकडे ग्रामस्थांची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराच्या काम संबंधित ठेकेदाराकडून संथगतीने सुरू असून, या कामामध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा ग्रामस्थांमधून केली जात आहे. दरम्यान ग्रामपंचायतीचे माजी सदस्य जालिंदर कुरुमकर यांनी पुरातत्व विभागाने हाती घेतलेले काम निष्कृष्ट दर्जाचे केले जात आहे. असा आरोप श्री कुरुमकर यांनी केला आहे. जालिंदर कुरुमकर व काही ग्रामस्थांनी पत्रकारांना अधिक माहिती देताना सांगितले की, लिंपणगावच्या सिद्धेश्वर मंदिर जीर्णोद्धार कामासाठी पुरातत्त्व विभागाकडे मोठा निधी उपलब्ध झाला आहे. सदर काम संबंधित एका ठेकेदाराकडे देण्यात आले आहे. गेल्या आठ नऊ महिन्यापासून मंदिराच्या चहुबाजूने दगडी फरशी बसवली जात आहे. परंतु हे काम अत्यंत संथ गतीने होत असल्याने भाविक भक्तांना दर्शनासाठी मंदिर परिसरात अडथळा निर्माण होत आहे. त्याबरोबरच मंदिराच्या गाभाऱ्यातील संबंधित ठेकेदाराने एक वेगळ्या प्रकारचे विशिष्ट असे लिक्विड टाकून जुना कलर काढण्याचे काम केले. परंतु त्या लिक्विडमुळे भिंतीचे दगड जीर्ण स्वरूपात होताना दिसत आहेत.



मंदिरात प्रवेश केल्यानंतर एक वेगळ्या प्रकारचा दुर्गंधीयुक्त वास मंदिरात पसरत असून अनेकांना त्याचा त्रास देखील होत आहे. याबाबत पुरातत्त्व विभागाकडे ग्रामस्थांनी तक्रारी केल्या, परंतु संबंधित पुरातत विभागाचे अधिकारी व ठेकेदार याची दखल घेत नाहीत. गेल्या आठ नऊ महिन्यापासून मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. पुरातत्व भागाकडे निधी देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे, त्या निधीचा विनियोग योग्य रीतीने व्हावा, अशी अपेक्षा देखील ग्रामस्थांमधून व्यक्त केली जात आहे.

## प्रामाणिकपणा व कष्ट करण्याची तयारी असेल तर यश निश्चित : चिंतामण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये काही ना काही सुप्त शक्ती असतात ; त्या ओळखून विद्यार्थ्यांनी आपली ध्येय निश्चित करून त्या दिशेने जिद्द,चिकाटी, प्रामाणिक कष्ट केल्यास यश निश्चित मिळते असे प्रतिपादन आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती अंजली चिंतामण यांनी केले. त्या आज शहरटाकळी विद्यालयातील माजी विद्यार्थिनी कु. कल्याणी सिताराम कुंडकर यांची बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये निवड झाल्याबद्दल तसेच माजी विद्यार्थी दिपक संभाजी जाधव यांची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाल्याबद्दल विद्यालयात आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या.



पुढे बोलताना चिंतामण म्हणाल्या की गुणवंत विद्यार्थी हे विद्यालयाची हिरे आहेत. इतर विद्यार्थ्यांनीही या गुणवंताचा आदर्श घेऊन असेच उज्वल यश मिळावे असेही त्या म्हणाल्या. यावेळी सत्काराला उत्तर देताना कल्याणी कुंडकर म्हणाल्या की, ज्या शाळेत आपण शिकलो त्याच शाळेत आपला सत्कार व्हावा हे माझे स्वप्न होते. आज ते स्वप्न पूर्णत्वास जाताना अत्यानंद होत आहे. या विद्यालयातील शिक्षकांनी माझा शैक्षणिक पाया भक्कम केला.तसेच संस्थेबद्दल व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कल्याणीचे वडील सिताराम कुंडकर बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपला वेळ व्यर्थ न घालवता तो सत्कारणी लावला पाहिजे. यावेळी त्यांनीही संस्थेविषयी व विद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यालयाच्या वतीने दोन्ही गुणवंतांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कमानदार यांनी तर आभार बाळकृष्ण ठोंबळ यांनी मानले. यावेळी संतोष खरड, सिताराम कुंडकर, सहशिक्षक गणेश लबडे, बाळकृष्ण ठोंबळ, ज्ञानेश्वर जाधव, निलोफर शेख, बाळासाहेब दिंडे ,सचिन कमानदार, रामदास पांढरे, रीना हांडे, दिपक बोडखे, कमल तुळसे, आदिनाथ काटे, राहुल गायके, सचिन गाडे उपस्थित होते.

## श्रीगोंद्यातही दूध भेसळीचा सुळसुळाट?

### ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची चर्चा

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** राज्यभर दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळीचा प्रश्न गंभीर बनत असताना श्रीगोंदा तालुक्यातही दूध संकलन केंद्रे, डेअरी व्यवसाय आणि दुग्धजन्य पदार्थ विक्री व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दूधाच्या खरेदी-विक्रीची पारदर्शक नोंद नसल्याने भेसळयुक्त दूध आणि बनावट दुग्धजन्य पदार्थांचा बाजार वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

सामाजिक कार्यकर्ते वैरागी यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाकडे निवेदन देत राज्यातील सर्व दूध संकलन केंद्रे, दूध संघ, डेअरी, मिठाई उत्पादक संस्था तसेच दुग्धजन्य पदार्थ उत्पादकांनी दररोजच्या आवक-जावक नोंदी शासनाकडे सादर करणे बंधनकारक करण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा तालुक्यातील दूध व्यवसायावरही लक्ष केंद्रीत झाले आहे.तालुक्यात दररोज हजारो लिटर दूध संकलित केले जाते. मात्र संकलित झालेले दूध नेमके कुठे जाते, त्यापासून किती दुग्धजन्य पदार्थ तयार होतात आणि बाजारात किती विक्री होते याचा ठोस हिशेब अनेक ठिकाणी उपलब्ध नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे भेसळयुक्त दूध, कृत्रिम पदार्थ आणि बनावट दुग्धजन्य उत्पादनांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप होत आहे.विशेष म्हणजे अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यभर भेसळखोरांविरोधात कारवाया सुरू असताना श्रीगोंदा तालुक्यातील दूध व्यवसायाचीही सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी ग्राहक संघटनांकडून होत आहे. दूध संकलन केंद्रांपासून मिठाई उत्पादकांपर्यंत सर्व व्यवहार ऑनलाइन नोंदवहीद्वारे शासनाच्या नियंत्रणाखाली आणल्यास भेसळीवर मोठा आळा बसू शकतो, असे जाणकारांचे मत आहे.

ग्राहकांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे. दुधात भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई आणि प्रत्येक थेंबाचा हिशेब हीच काळाची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. श्रीगोंदा तालुक्यातील दूध व्यवसायाची तपासणी करून वास्तव समोर आणण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## लिफ्ट बंद, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही

### पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन इमारतीतील गैरसोयी दूर करण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपरिषदेची नव्याने उभारण्यात आलेली सुसज्ज व भव्य प्रशासकीय इमारत नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली असली, तरी इमारतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांसह कर्मचारी वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप तालुका अपंग संघटनेने केला आहे. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष हाजी हुमायूनभाई आतार यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदन देऊन तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगरपरिषदेच्या तीन ते चार मजली इमारतीत लिफ्टची व्यवस्था करण्यात आली असली तरी ती सध्या बंद अवस्थेत आहे. त्यामुळे विविध कामांसाठी नगरपरिषद कार्यालयात येणारे अपंग बांधव, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच कर्मचारी यांना



वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्ती व वृद्ध नागरिकांना जिने चढताना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांचे हाल होत आहेत.

तसेच इमारतीतील जिन्यांच्या पायऱ्यांना बाजूने आधारासाठी रेलिंग अथवा सुरक्षित पकड व्यवस्था अपुरी असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. याशिवाय नगरपरिषद इमारतीत नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. अनेकदा नागरिकांना कार्यालयीन कामकाजासाठी तासन्तास थांबावे लागते; मात्र त्यांच्यासाठी मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत आहे. दरम्यान, वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी वीज बॅकअपची व्यवस्था नसल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प होते. नागरिकांना तसेच कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ वीज येण्याची प्रतीक्षा करावी लागते, त्यामुळे कामांमध्ये विलंब होऊन गैरसोय निर्माण होत असल्याचेही जाणवते अपंग बांधव, ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनींच्या सोयीसाठी लिफ्ट तातडीने सुरू करणे, सुरक्षित रेलिंग बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आणि वीज बॅकअप उपलब्ध करून देणे या मागण्या प्रशासनाने त्वरित पूर्ण कराव्यात, अशी मागणी हाजी हुमायूनभाई आतार यांनी केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास अपंग बांधवांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही तालुका अपंग संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## ढवळगाव - रायगव्हाण शिवरस्त्याचे सीमांकन



**लिंपणगाव :** श्रीगोंदा पारनेर, उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी अभिलेख उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार तसेच शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली, ढवळगाव - रायगव्हाण येथील सुमारे २.५ किलोमीटर शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी पूर्ण केले. सदर शिवरस्ता झिरो शिव निघालेला असल्यामुळे दोन्ही गावांची सीमा निश्चित करण्यात आली. गावाच्या वहिवाटीचा व विकासाचा विचार करून सरपंच रवी शिंदेसाहेब व ग्रामस्थांनी सकारात्मक चर्चा केली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आवश्यकतेनुसार १०-१० फूट वैयक्तिक क्षेत्र देऊन रस्ता विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले. यासाठी सर्व गटधारक शेतकऱ्यांची बैठक घेऊन संमतीपत्राद्वारे सहकार्य मिळवून रस्ता तयार करण्याचे आश्वासन सरपंचांनी दिले. तसेच लवकरात लवकर या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून तो दर्जेदार व कायमस्वरूपी स्वरूपात विकसित करण्यात येईल, अशी ग्वाही चळवळीच्या वतीने देण्यात आली. यावेळी चळवळीचे दादासाहेब जंगले, क्षेत्रीय समिती सदस्य जालिंदर कातोरे, रामचंद्र अडसरे गुरुजी, सरपंच रवी शिंदे, तलाठी मॅडम, पो. कॉ. गांगुर्डे व ग्रामस्थ उपस्थित होते. या कामासाठी सहकार्य करणारे प्रशासन, ग्रामपंचायत, सर्व गटधारक शेतकरी व ग्रामस्थ यांचे शिवपानंद शेत रस्ते चळवळीच्यावतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# अण्णांच्या प्रेरणेचा दीप अधिक तेजस्वी!

### समाजसेवेच्या पाच दीपस्तंभांचा राळेगणसिद्धीत गौरव...

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** समाजासाठी निःस्वार्थ भावनेने आयुष्य अर्पण करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान म्हणजे समाजातील चांगुलपणाचा गौरव होय. अशाच प्रेरणादायी वातावरणात ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी व राळेगणसिद्धी परिवाराच्या वतीने समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या पाच मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

अण्णा हजारे यांना देश-विदेशातून प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या रकमेतून निर्माण झालेल्या निधीच्या व्याजातून हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावर्षी जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुवेंद्र महाजन यांना दोन लाख रुपयांचा




अण्णासाहेब हजारे सामाजिक सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय बीड जिल्ह्यातील शांतिवन प्रकल्पाचे दीपक नागरगोजे यांना दीड लाख रुपये, तर नाशिकचे माजी सैनिक शिवाजीराव ढोले, अहिल्यानगर जिल्ह्यातील महाग्राम बाबा आमटे सेवा संस्थेचे अनंत झेंडे आणि बुलढाणा येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानचे डॉ. नंदूकुमार पालवे यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला नवी ऊर्जा देणे, हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश असून अण्णांच्या प्रेरणेचा हा दीप पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरत असल्याची भावना यावेळी भास्करगिरी महाराजांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली.

यावेळी सन्मान स्वीकारल्यानंतर बोलताना यजुवेंद्र महाजन यांनी अण्णा हजारे यांच्या कार्याला वंदन करत सांगितले की, शासन आणि प्रशासनाशी संघर्ष करून सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी कायदे निर्माण करणारे अण्णा हजारे हे आधुनिक भारतातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनाथ, दिव्यांग, तृतीयपंथी आणि वंचित युवकांसाठी देशव्यापी संधी निर्माण करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

समाजाने दिलेला सन्मान आणि पुरस्कार हा माझा नसून समाजाचाच आहे. म्हणूनच मला मिळालेल्या पुरस्कारांची रक्कम पुन्हा समाजकार्यासाठी वापरण्याचा निर्णय घेतला. निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील चांगुलपणाला बळ देणे होय. पुरस्कारामुळे केवळ गौरव होत नाही, तर समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणाही मिळते. देश बदलायचा असेल तर सेवाभावी, प्रामाणिक आणि त्यागी माणसे घडली पाहिजेत. अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी समाजाने उभे राहणे, हीच खरी समाजसेवा आहे.

**- ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे.**

या कार्यक्रमाला भास्करगिरी महाराज, पद्मश्री पोपटराव पवार, संत तुकाराम महाराजांचे वंशज मोरे महाराज यांच्यासह राज्यभरातील समाजसेवक, कार्यकर्ते आणि अण्णांवर प्रेम करणाऱ्या नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजाराम गाजरे यांनी केले. सूत्रसंचालन सुभाष पठारे व रमेश पठारे यांनी केले, तर राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंग मापारी यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दगडू मापारी, शिवाजी मापारी, राजाराम गाजरे, लक्ष्मण मापारी, कांतिलाल मापारी, रामदास सातकर,सुनिल हजारे, गणेश हजारे, सदाशिव पठारे, दत्ता आवारी, नाना आवारी, गोविंद नलगे, मनोज मुठे यांच्यासह राळेगणसिद्धीतील अनेक ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## राहुरीच्या रेल्वे स्थानकावर पुणे-शिर्डी एक्सप्रेसचे भव्य स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नुकतीच नव्याने सुरू झालेल्या पुणे-शिर्डी एक्सप्रेस रेल्वे गाडीचे राहुरी रेल्वे स्थानकावर मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, प्रवासी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्वागत सोहळ्यास माजी खासदार प्रसादराव तनपुरे, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब पेरणे, सचिव मंगल जैन, रेल्वे सल्लागार समिती सदस्य प्रभाकर धसाळ, माजी उपसरपंच इंद्रभान पेरणे, गोरक्षनाथ खडके, ज्येष्ठ पत्रकार निसारभाई सय्यद, मुख्याध्यापक सर्जेराव पेरणे, कानिफनाथ धसाळ, हभप महेश महाराज खाटेकर, संतोष पवार, भैय्यासाहेब आढाव, गणपत पेरणे, सुखदेव खाटेकर, शिवाजी खडके, अविनाश पेरणे, साहेबराव म्हसे, सुनील हिवाळे, रावसाहेब खडके, उपसरपंच ज्ञानेश्वर खिलारे, ईश्वर खिलारे, रवींद्र पेरणे, उमेश पेरणे, नंदू पेरणे, अभिजित खडके, गाहिनीनाथ पेरणे, अशोक तोडमल, शंकर लष्करे, कासिम शेख, नितीन मकासरे, प्रवीण जाधव, सिद्धार्थ पेरणे, स्वप्निल धसाळ, बादल शिंदे, आप्पा लोखंडे, काशिनाथ धागुडे, प्रमोद खडके, रेवन्नाथ धसाळ, मच्छिंद्र लोखंडे, रमेश लोखंडे, अजय कन्नाके, पत्रकार विनीत धसाळ आणि उत्तम बनसोडे आदी उपस्थित होते.



राहुरी रेल्वे स्टेशन येथे पुणे शिर्डी एक्सप्रेस रेल्वे गाडीला थांबा मिळाला असून गाडीला झेंडा दाखवून स्वागत करताना माजी खासदार प्रसादराव तनपुरे समवेत व ग्रामस्थ दिसत आहेत.
**छाया : उत्तम बनसोडे**

यावेळी पुणे-शिर्डी एक्सप्रेसचे लोको पायलट प्रेम प्रकाश, सह लोको पायलट सवाई सुरज तसेच परिवहन निरीक्षक अनिल अमुले यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी रेल्वे कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत या रेल्वे सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी रेल्वे प्रशासनाच्या वतीने सी.सी.एस. एस.ए. बेलपवार, मुख्य तिकीट निरीक्षक एच.आर. कुलथे, स्टेशन प्रबंधक जितेंद्र मीना, डी.एस. वाळके आणि हेमराज ठाकूर हे अधिकारी उपस्थित होते.

त्यांनी प्रवाशांना नव्या रेल्वे सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. पुणे-शिर्डी एक्सप्रेसच्या प्रारंभामुळे पुणे, राहुरी आणि शिर्डी दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. विशेषतः शिर्डी येथे दर्शनासाठी जाणारे भाविक, विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि व्यावसायिकांना या सेवेचा मोठा लाभ होणार आहे. रेल्वे गाडीच्या स्वागतासाठी स्थानकावर जमलेल्या नागरिकांनी आनंद व्यक्त करत रेल्वे प्रशासनाचे आभार मानले. या भव्य स्वागत सोहळ्यामुळे राहुरी रेल्वे स्थानक परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## जळालेल्या अवस्थेत तरुणाचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील बेलगाव शिवारात जुन्या बेलगाव वैजापूर रोडवर एकाचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याची खळबळजनक घटना बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास शेतकरी संदीप निमसे यांना जुन्या बेलगाव वैजापूर रोडवर बेलगाव शिवारात ईश्वरसिंग राजपूत यांच्या पडीत शेतात एका इसमाचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह दिसून आला. निमसे यांनी तातडीने याबाबत दूरध्वनीद्वारे पोलिस पाटील अनिल धीवर यांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटील धीवर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

त्यांना घटनास्थळी अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचा पुरुषाचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह दिसून आला.पोलिस पाटील धीवर यांनी घटनेची वैजापूर पोलिसांना माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सत्यजीत ताईतवाले यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक पथक,श्वान पथकाची पाचारण करण्यात आले. उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी मृताची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू केले. पोलिसांनी तपास करत मृताची ओळख पटवली असून मृताचे नाव सीताराम छगन बावरी रा. निंबाळा राज्य राजस्थान असे असल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली.

पोलिसांनी मृतदेह वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केला. या प्रकरणात पोलिस पाटील अनिल धीवर यांनी दिलेल्या माहितीनुसार वैजापूर पोलिसांत घटनेची नोंद करण्यात आली आहे.

## मोटरसायकलचे नियंत्रण सुटल्याने झाडाला धडकुन तरुणाचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : तालुक्यातील टाकळीमिया गावातील जुन्दरवाडी रोड येथील सचिन झुंबर क्षीरसागर या तरुणाचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. टाकळीमिया रोडवरील माऊलाई परिसरात त्यांची दुचाकी झाडाला धडकल्याने हा अपघात झाला. या घटनेतील मिळालेल्या माहितीनुसार, सचिन क्षीरसागर हे राहुरीहून पेंटिंगचे काम करून टाकळीमियाकडे त्यांच्या युनिकॉर्न दुचाकीवरून जात होते.

दरम्यान माऊलाई परिसरात दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्यालगतच्या झाडाला जोरात आदळले. या भीषण अपघातात ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर काही नागरिकांच्या निदर्शनास ही घटना येताच त्यांनी तत्काळ शिवाज्ञा रुग्णवाहिकेला माहिती दिली. जखमी अवस्थेतील सचिन क्षीरसागर यांना राहुरी येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथे हलविण्यात येत होते. दरम्यान रस्त्यातच त्यांची हालचाल बंद झाल्याने त्यांना राहुरी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सचिन क्षीरसागर याच्या पश्चात आई वडील व एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेमुळे टाकळीमिया परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरा पर्यंत सुरू होती. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## देवळाली प्रवरात जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा; आठ जुगारी ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा परिसरातील खटकळी येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून आठ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम व जुगार साहित्यांसह एकूण ३ लाख २७ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जून रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस कॉन्स्टेबल रिचर्ड गायकवाड, रमीजराजा आत्तार, विशाल तनपुरे व चालक अरुण मोरे यांचे पथक राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते.



त्यावेळी गुप्त माहितीदाराकडून खटकळी येथे जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने खटकळी येथील सचिन घोरपडे यांच्या बांधकाम सुरू असलेल्या घरावर छापा टाकला. तेथे काही व्यक्ती जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सर्वांना ताब्यात घेतले व घटनास्थळावरून रोख रक्कम तसेच जुगार खेळण्याचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विशाल तनपुरे यांच्या फिर्यादीवरून सचिन दिलीप घोरपडे, दीपक किसन फुलारे, शिवाजी माधव होले, दत्तू कचरू धाकतोडे, मनोज भागवत पंडित, शैलेश भाऊसाहेब विधाते, प्रकाश दत्तात्रय जाधव आणि मुश्ताक बादशाह शेख या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२ (अ) अन्वये राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७०१/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बेकायदा खतसाठा प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शिंगवे तुकाई येथे जिल्हा परिषद कृषी विभागाने केलेल्या छापेमारीत सुमारे २१ लाख रुपयांचा बेकायदा रासायनिक खतसाठा जप्त झाल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. या कारवाईचे शेतकरी वर्गातून स्वागत होत असले तरी या प्रकरणाची केवळ जप्तीपुरती मर्यादा न ठेवता संपूर्ण साखळीची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

शेतकरी व नागरिकांमध्ये असा प्रश्न उपस्थित केला जात आहे की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर खतांची पॅकिंग, साठवणूक आणि विक्री सुरू असताना संबंधित यंत्रणांच्या निदर्शनास हे प्रकरण यापूर्वी का आले नाही? तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित तपासण्या केल्या होत्या का, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

या प्रकरणात बेकायदा युनिट किती काळ सुरू होते, कोणत्या कृषी सेवा केंद्रांना खतांचा पुरवठा करण्यात आला, किती खताची विक्री झाली आणि शेतकऱ्यांना त्यातून किती नुकसान झाले याचा तपास करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. शेतकरी नेते नरेंद्र काळे यांनी सांगितले की, न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नसले तरी आर्थिक व्यवहार, खरेदी-विक्री नोंदी, वाहतूक कागदपत्रे आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. दोषींना संरक्षण न देता उत्पादनापासून विक्रीपर्यंतची संपूर्ण साखळी उघड करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

## सेल्समनला चाकूचा धाक दाखवून लुटले, तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई-खरवंडी रोडवर कामावरून घरी जात असलेल्या एका तरुणाला अडवून मारहाण करत चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राहुल मोहन मोकाटे (वय २२, रा. सोनई) हे सरकारी रुग्णालयातून घरी जात असताना आरोपी संजय उर्फ गोंड्या नितीन वैरागर, जेम्स अँन्थनी साळवे (दोघे रा. राजवाडा, सोनई) व ओंकार अंकुश साप्ते (रा. बेल्हेकरकरवाडी रोड) यांनी त्यांना अडवून पैशांची मागणी केली. नंतर चापट व लाथाबुक्यांनी मारहाण करून चाकूचा धाक दाखवत ५० हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी, ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी व ४०० रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख २० हजार ४०० रुपयांचा ऐवज हिसकावून घेतला. तसेच अंगठी व दुचाकी परत हवी असल्यास ४० हजार रुपये देण्याची मागणी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे करीत आहेत.

## शेळ्यांना दगड मारल्याच्या संशयावरून कुटुंबाला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेळ्यांना दगड मारल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका कुटुंबातील तिघांना लाकडी काठी, लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथे घडली. याप्रकरणी चार जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगल जितेंद्र कुंभकर्ण (वय ३६) या कुटुंबासह तांदुळवाडी येथे राहतात. १३ जून रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास शेजारी राहणारे बापू नामदेव खेडेकर व त्यांच्या कुटुंबीयांनी कुंभकर्ण यांच्या घरी येऊन शेळ्यांना दगड मारल्याचा आरोप करत वाद घातला. यावेळी मंगल कुंभकर्ण यांनी आरोप फेटाळून लावल्यानंतर संतप्त झालेल्या आरोपींनी त्यांना व त्यांचे पती जितेंद्र कुंभकर्ण यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद सोडवण्यासाठी आलेल्या त्यांच्या मुलालाही लाकडी काठीने मारहाण करून दुखापत करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या गोंधळात मंगल कुंभकर्ण यांच्या गळ्यातील सुमारे साडेतीन ग्रॅम वजनाचे मनी-मंगळसूत्र हरवले. तसेच पुन्हा आमच्या नादी लागल्यास जीवे ठार मारण्याची धमकीही आरोपींनी दिल्याचा आरोप आहे. मंगल जितेंद्र कुंभकर्ण यांच्या फिर्यादीवरून बापू नामदेव खेडेकर, इज्याबाई बापू खेडेकर, जयदीप बापू खेडेकर व तुषार बापू खेडेकर (सर्व रा. तांदुळवाडी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख करीत आहेत.

## आठवडे बाजारात सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोन महिलांना रंगेहात पकडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील आठवडे बाजारात सोन्याचे दागिने चोरी करुन पळत असताना दोन महिलांना रंगेहात पकडुन पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना दि. १३ जून रोजी घडली. मनिषा चंद्रकांत भांड, वय ३८ वर्षे, रा. खांदेगल्ली, देवळाली प्रवरा, ता. राहुरी, ह्या दि. १३ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास देवळाली प्रवरा येथील आठवडे बाजारात बाजार करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या सोबत त्यांचा साडेतीन वर्षांचा मुलगा व पुतणी होती. बाजारातील गर्दीचा फायदा घेऊन दोन महिलांनी मनिषा भांड यांच्या मुलाच्या गळ्यातील सोन्याचे ओमपान व सटूबाई असे एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तोडुन घेतले. सदर घटना मनिषा भांड यांच्या लक्षात आली. त्यानंतर भामट्या महिला पळून जात असताना मनिषा भांड व त्यांच्या पुतणीने त्या महिलांना रंगेहात पकडुन पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर मनिषा चंद्रकांत भांड यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी रेश्मा मिना गायकवाड व निशा अर्जुन गायकवाड, दोन्ही रा. इंदीरानगर, संगमनेर, या भामट्या महिलांवर गुन्हा रजि. नं. ६९१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३ (५), ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## मुळा धरणाचा जिवंत साठा १० टक्क्यांखाली

### रोटेशन सुरू ठेवल्याने अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्याची तहान भागविणारे मुळा धरण सध्या गंभीर जलसंकटाच्या उंबरठ्यावर असून धरणातील जिवंत पाणीसाठा १० टक्क्यांहून कमी झाल्याची माहिती समोर आली आहे. पाणीसाठा झपाट्याने घटत असतानाही सिंचनासाठी आवर्तने (रोटेशन) सुरू ठेवण्यात आल्याने मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.



२६ टीएमसी क्षमतेच्या मुळा धरणातील पाणीसाठा यंदा कमी पावसामुळे चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. एल निनोच्या संभाव्य परिणामांबाबत हवामान विभागाकडून वारंवार इशारे दिले जात असतानाही जलसंपदा विभागाने परिस्थितीचे गांभीर्य पुरेसे ओळखले नसल्याचा आरोप होत आहे. धरणातून दररोज मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होत असून उन्हामुळे बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढले आहे. राज्य शासनाने धरणांतील पाणीसाठा जपण्यासाठी पाणी बचतीच्या उपाययोजना आणि सिंचन आवर्तने बंद करण्याचे निर्देश दिले असतानाही स्थानिक स्तरावर आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### राहुरी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

मुळा धरणातील पाणीपातळी घटल्याचा फटका राहुरी शहरालाही बसला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोटारी उघड्या पडल्याने नगरपालिका प्रशासनाला पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. गेल्या महिनाभरापासून पाणीटंचाई तीव्र झाली असून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. काही भागांत गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत. परिस्थिती हाताळण्यासाठी नगरपालिका कर्मचारी धरण परिसरात रात्रंदिवस प्रयत्न करत आहेत.

### चौकशीची मागणी

मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांना धरण व्यवस्थापनाचा अनुभव असतानाही पाणीसाठा इतक्या खालच्या पातळीवर कसा आला, याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने प्रशासनाने तातडीने नियोजनात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## साई के दरबार मे देर है, अंधेर नही!

### वॉटर पार्कमध्ये हरवलेले सोने सहा दिवसांनी सापडले

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : हरियाणा राज्यातील साई भक्त शिर्डी येथे साई बाबाच्या दर्शनासाठी आले असता वॉटर पार्क मधे पोहण्याचा छंद त्यांच्या चांगलाच अंगलट आला होता. त्यांच्या जवळ असणारे दहा तोळे सोने गहाळ झाल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागला. त्या दागिन्यांचा तपास न लागल्याने त्या साई भक्तांना रिकाम्या हाताने परतावे लागले. परंतू तब्बल सहा दिवसानंतर पाण्याच्या टाक्या साफ करत असताना गाळात अडकलेले ते सोने मिळून आले.

तर शिर्डी पोलीसांच्या हस्ते सदर दागिने भक्तांना परत करण्यात आल्याने साई के दरबार में देर है, अंधेर नही ! याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला आहे. हरियाणा राज्यातील संदीप कुमार शेटीया हे साई बाबा चे निस्सीम भक्त असून ते नित्य नेमाने शिर्डीस साई दर्शनासाठी हजेरी लावत असतात या ही वेळी ते दि ११ जून रोजी आपल्या कुटूंबा समवेत शिर्डीत दाखल झाले होते. दर्शनानंतर शिर्डी येथील वेट अँन्ड जॉय वॉटर पार्कमधे दुपारी प्रवेश केला. त्यांनी आपले कपडे लॉकरमधे ठेवून त्यांच्याकडे दहा तोळे सोनेचे दागिने एका पर्स मधे ठेवत खिशात घालून रायडींग मधे पाण्यात खेळण्यास सुरुवात केली. पहिल्याच रायडींग नंतर त्यांना पर्स खिशात नसल्याचे लक्षात आले.

प्रशासनाच्या लक्षात हा प्रकार आणून दिला व शोध मोहीम सुरू झाली, मात्र ते सोने सापडले नाही. अखेर त्यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून पर्सचा शोध घेतला पण त्यांच्या पदरी निराशाच आली. अखेर त्यांना जड अंतःकरणाने शिर्डी सोडावी लागली. या शोध मोहीमेसाठी शिर्डीचे भूमीपुत्र तथा भाजपा कार्यकर्ते नानासाहेब शिंदे यांनी मोठा पुढाकार घेतला. अखेर दि १६ जून रोजी वॉटर पार्क मधील पाण्याच्या टाक्या साफ करत असताना गाळात अडकलेले सोनं सफाई कामगारांच्या हाती लागले. तेथील व्यवस्थापक अनुप बजाज यांनी सदर साई भक्त व शिर्डी पोलीसांना खबर देत ते सोने साई भक्तांना सुपूर्द केले.